# माणूस

८ मार्च १९६९ । चाळीस पैसे

मी वय वर्षे तेवीस ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ?

गेले कित्येक महिने कच्छमध्ये आहे ? ? ? ? ? ? ? ? ? ? ? ?

जे काही पाहिले आणि पाहतो आहे ? ? ? ? ? ? ? ? ? ? ?

....*मनोगते*



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. फेब्रुवारी, २५

आपला २२ फेब्रुवारीचा 'माणूस' वाचला. 'राणीचा बाग' हा कथा-लेख खूप आवडला. त्या संदर्भात काढलेले मुखपृष्ठही छान आहे. "सामाजिक जाणिवेसाठी माणूस" ही 'माणूस'ची प्रतिमा यामुळे अधिक स्पष्ट होते. लेखक श्री. वसंत जोशी व आपणांस धन्यवाद.

**वामन नवांगुळ**, सांगली

स. न. फेब्रुवारी, २५

दि. २२ फेब्रुवारीच्या अंकातील, सौ. निर्मला वैद्य यांचा "आत्मार्पण" हा लेख वाचला. स्वातंत्र्यवीर यांचे सारे जीवनच महान तसे यांचे महानिर्वाणही. सौ. निर्मलाबाईसारख्या एका निकटवर्ती, अप्रसिद्ध लेखिकेने आपल्या ऋजू भाषेने ते सशब्द करणे हे कौतुकास्पद आहे. धन्यवाद. याबाबत मागे औरंगाबादच्या एस्. टी. अपघातावरील श्री. साठे यांच्यासारख्या अशाच एका अप्रसिद्ध लेखकाने जिवंत केलेल्या चित्रणाची आठवण येणे अपरिहार्य आहे.

**उत्तम जोग**, विलोली.

स. न. फेब्रुवारी, २४

दि. २२ फेब्रुवारीचा अंक वाचला. राणीचा बाग हा लेख हृद्य वाटला. महाराष्ट्रातील धार्मिक पंथांचे कार्य

किमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

हा पुणे विद्यापीठामधील विद्यार्थ्यांच्या विचारावर आधारित लेख अत्यंत वाचनीय आहे. या लेखामधील मंदिराचे छायाचित्र खरे म्हणजे अंकाच्या मुखपृष्ठावर छापायला हवे होते. श्री. व्यं. न. कुलकर्णी यांचा लेख अंतर्मुख करतो.

**गजानन बोभाटे,** मुंबई

**स. न.** फेब्रुवारी, २४

दिनांक २२ फेब्रुवारीच्या अंकातील सौ. निर्मला वैद्य यांचा 'आत्मार्पण' हा लेख वाचला. खरोखरच वाचताना वीर सावरकरांच्या आठवणीने मन दुःखाने, आश्चर्याने नि आदराने भरून येते. मानव हा मृत्यूच्या जबड्यात जातोच, पण त्याच्या आठवणी, कृती या मात्र अमर राहतात. तद्वतच वीर तात्याराव सावरकरांचे आहे. आणि आजच्या काळात अशा दिव्य पुरुषांच्या मार्गदर्शनाची जरुरी आहे. विनंती की 'माणूस'च्या अंकातून वीर तात्याराव सावरकरांच्या आयुष्यातील संपूर्ण (जरी नाही) तरी काही ठळक प्रसंग प्रसिद्ध केल्यास आजच्या तरुणांस त्यातून बराच काही बोध घेता येईल.

**प्रा. विजय मोळकर,** सांगली

**स. न.** फेब्रुवारी, १०

दिनांक १ फेब्रुवारीचा 'माणूस' हाती पडताच प्रथम काय वाचले असेल तर 'तो मी नव्हेच!' अ‍ॅड. माधव कानिटकर यांनी लिहिलेला हा खन खटला फारच रंगला! त्याबद्दल अ‍ॅड. कानिटकर साहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन!

श्री. व्यं. न. कुलकर्णी यांनी 'माणूस'च्या बाबतीत केलेली प्रशंसा अती वाटली. 'भिंतीच्या तुंबड्या' नेहमीप्रमाणेच (बऱ्या) होत्या.

**मनोहर पाडावे, श्याम पाडावे,** मुंबई ६.

**स. न.** फेब्रुवारी, ९

'माणूस'मधील अ‍ॅड. कानिटकरांची 'तो मी नव्हेच' ही लेखमाला आवडली. लेखकाची निवेदनशैली चांगली असल्याने पुढील लेखाबाबत चांगलीच उत्सुकता निर्माण होत होती. अशा लेखमाला 'माणूस'मध्ये अधूनमधून जरूर प्रसिद्ध कराव्या.

'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' दत्तप्रसाद दाभोळकर यांनी घेतलेल्या मुलाखती अत्यंत मननीय आहेत. डॉ. आत्माराम कचरे यांनी महाराष्ट्रातील सद्यःस्थितीवर अचूक बोट ठेवले आहे. विशेषतः, डॉ. कृ. श्री. नरगुंद यांची मुलाखत भारतातील सर्वच युवकांना मार्गदर्शक आहे. एवढे दर्जेदार लिखाण 'माणूस'मधून अलीकडे वाचावयास मिळाले नव्हते.

अलीकडच्या 'माणूस'च्या अंकातील कथांत 'पिंड' (चंद्रकांत वर्तक) व डॉक्टर (मुक्ता केणेकर) या कथा निश्चित चांगल्या होत्या. 'माणूस'ला शुभेच्छा.

**सौ. पुष्पा पंचवाघ,** फलटण.

मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# रेल्वे-अर्थसंकल्प !

श्रीमती इंदिरा गांधींनी मंत्रिमंडळाची फेररचना केल्यामुळे रेल्वे-खाते हातात आल्यानंतर अवघ्या चारच दिवसांत श्री. राम सुभग सिंग ह्यांना लोकसभेला रेल्वेचा १९६९-७० चा अर्थसंकल्प सादर करावा लागला; आणि महत्त्वपूर्ण ठरेल अशाच पद्धतीने त्यांनी तो सादर केला. गेल्या चार वर्षांच्या काळात यंदा प्रथमच, रेल्वेच्या अर्थसंकल्पात जवळजवळ दोन कोटींची शिल्लक दाखवली गेली आहे. शेती-उत्पादनात जरी समाधानकारक वाढ असली, व त्यामुळे रेल्वेच्या वाहतूक वसुलीत जरी परिणामकारक सुधारणा व्हायची शक्यता असली तरी अद्यापही, मंदीच्या तडाख्यात सापडलेल्या बहुसंख्य उद्योगधंद्यांना, त्या भोवऱ्यातून बाहेर पडणे जमलेले नाही व त्यामुळे साहजिकच, उत्पादनाने कमाल मर्यादा गाठलेली नाही. अर्थातच, औद्योगिक उत्पादनाच्या रेल्वे वाहतुकीत फार मोठी भर येत्या आर्थिक वर्षात पडेल ह्याची निश्चित ग्वाही नाही. ह्या पार्श्वभूमीवर, श्री. राम सुभग सिंगांचा शिलकी अर्थसंकल्प महत्त्वाचा वाटतो, व भारतीय रेल्वेच्या आर्थिक परिस्थितीतील सुधारणेचाच तो द्योतक वाटतो. अर्थात, दोन कोटींची शिल्लक ही, रेल्वेचा अवाढव्य कारभार पाहता, फारच नाममात्र आहे व तीमुळे फारसे हुरळून जायचे कारण नाही; तरीही आर्थिक कोंडी फोडण्यात रेल्वे यशस्वी होत आहेसे मात्र निश्चित वाटते.

भारतीय रेल्वे हा शासनाचा सर्वांत मोठा अंगीकृत व्यवसाय. त्यात सुमारे एकतीस अब्ज रुपयांची भांडवली गुंतवणूक असून, वार्षिक उलाढाल दहा अब्जांच्या घरात असते. यंदाच्या अर्थसंकल्पात अंदाजे ९४७ कोटी रुपयांचे उत्पन्न दाखवले असून ७८६ कोटींचा खर्च व सर्वसाधारण महसुलात जमा करण्यासाठी १५९ कोटी दाखवले असून १·९१ कोटींची शिल्लक दाखवण्यात आली आहे. देशातील एकूण वाहतुकीचा (प्रवासी व माल) जवळ जवळ साठ टक्के भाग रेल्वे सांभाळते. सर्वांत मोठा व मक्तेदारी व्यवसाय असल्याने तो अत्यंत कार्यक्षमपणे व किफायतशीरपणे चालणे, राष्ट्रीय आर्थिक आघाडीच्या मजबुतीकरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. स्वतःचा संपूर्ण कारभार व्यवस्थित चालवून, राष्ट्रीय गंगाजळीत महत्त्वाची भर वास्तविक रेल्वेने घालायला हवी, परंतु दुर्दैवाने गेल्या चार वर्षांत घडलंय ते नेमकं उलटं. रेल्वेने, राष्ट्रीय गंगाजळीतून साडेपंचेचाळीस कोटींची उचल घेतली आहे; आणि म्हणूनच, भारतीय रेल्वेची दोन कोटींची संकल्पित शिल्लक नाममात्र

वाटते. त्यांना अजून फार मोठी मजल गाठायची आहे. अधिकाधिक काटकसर, कार्यक्षम कारभार, अधिक उत्पादनशीलता, लाचलुचपत, चोरी-मारी, विनातिकिट प्रवास इ. चा पायबंद करून रेल्वेला ह्या दृष्टीने काही प्रमाणात वाटचाल करता येईल. त्याचबरोबर नवीन नवीन लोहमार्ग काढणे व किफायतशीर व्यवसायाची नवीन अंगे शोधणे हेही झाले पाहिजे. भारतीय रेल्वेच्या सुरुवातीपासूनच्या पहिल्या शतकात दरवर्षी सरासरी साडेतीनशे मैल लांबीचे नवे लोहमार्ग बांधले गेले; तर आर्थिक नियोजन सुरू झाल्यानंतरच्या गेल्या १८ वर्षांत दरवर्षी सरासरीने केवळ सव्वाशे मैलांचेच लोहमार्ग नव्याने अस्तित्वात आले. मात्र ह्याच अठरा वर्षांच्या काळात रेल्वेच्या विकास योजनांत जवळ जवळ, पूर्वीच्या मानाने दरवर्षी दुप्पट रक्कम खर्चण्यात आली ही गोष्ट रेल्वेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने निश्चितच हितावह नाही. त्याखेरीज त्यामुळे प्रादेशिक विषमता वाढीस लागते ती वेगळीच!

यंदाच्या विकासकार्यात गाड्या चालू ठेवण्याबाबत अधिक कार्यक्षमता, वाहतूक वाढ, ग्राहक-प्रवाशांच्या सोयीकडे अधिक लक्ष वगैरेंसाठी रेल्वे आपल्या परीने सर्व ते प्रयत्न करील असे श्री. सिंग म्हणतात. यंदा प्रवासी-भाडी व वाहतूक दर ह्यांच्यांत वाढ होणार नाही हाही ह्या अर्थसंकल्पाचा आणखी एक विशेष. काही मार्गांचे दुहेरीकरण, काही लोहमार्गांचे रुंदीकरण, नांदगाव-भुसावळ, विरार-अहमदाबाद, आंदुळ–कलकत्ता, कानपूर-तुंडला वगैरे मार्गांचे विद्युतीकरण, मुंबईला कुलाब्याला तिसरे रेल्वे-टर्मिनस वगैरे गोष्टींचा अंतर्भावही यंदाच्या विकास-योजनेत सादर करण्यात आला. एकंदरीत हा संकल्प फार दिव्य-भव्य नसला, तरी प्राप्त परिस्थितीचा विचार करता अगदीच निराशाजनकही नव्हता!

## नॅशनल सँपल सर्व्हे!

रेल्वेच्या शिलकी बजेटापाठोपाठ केंद्रीय अर्थमंत्र्यांनी १९६८-६९ चा आर्थिक आढावा घेतला. अन्नधान्याचे समाधानकारक उत्पादन, स्थिरावलेल्या किमती, उत्पादनातील वाढ वगैरेंचा आढावा घेऊन त्यांनी बजेट-पूर्व भाषणात, १९६९-७० ह्या आर्थिक वर्षाचे आशादायक चित्र रंगवले. शेती-मालाच्या उत्पादनातील अपेक्षित वाढ, औद्योगिक उत्पादन वाढ व वाढती निर्यात, ह्यांमुळे भारत गेल्या काही वर्षांतली कोंडी फोडून, आर्थिक आघाडीवर समाधानकारक प्रगती करू शकेल असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय उत्पादनात व दरडोई उत्पादनांतही वाढ झाल्याचे सांगितले व १९६९-७० मध्ये ही वाढ अधिक होईल, अशी अपेक्षा व्यक्तविली. राज्यसभेस पंतप्रधानांनी दरडोई उत्पन्नात वाढ झाली असल्याचे घोषित केले, व दरडोई उत्पन्नाचे राज्यवार आकडे दिले. त्यात पंजाब आघाडीवर आहे तर महाराष्ट्र, गुजराथ व हरियाना ही राज्ये त्या पाठोपाठ आहेत. (पंजाब रु. ५७५/–, महाराष्ट्र रु. ५२६/–, गुजरात रु. ५२३/–, व हरियाना रु. ५०३/–) सर्वांत कमी

दरडोई उत्पन्न बिहार (रु. २९९/–) मध्ये आहे. अन्य राज्यांचे आकडे पुढील प्रमाणे–आंध्र ४३८, आसाम ४४१, कश्मीर ३४१, केरळ ३९३, मध्य प्रदेश ३७३ म्हैसूर ४२०, ओरिसा ३४७, राजस्थान ३५६, मद्रास ४३४ आणि उत्तर प्रदेश ३७४. हे सर्व आकडे ऐकले आणि श्री. राम सुभग सिंग, उपपंतप्रधान मोरारजी देसाई व पंतप्रधान इंदिरा गांधी आदी नेत्यांची भाषणे वाचली की एक प्रकारचे आशादायक चित्र मनात तयार होऊ लागते. परंतु, नेमक्या ह्याच सुमारास नॅशनल सॅंपल सर्व्हे, हैद्राबाद, ह्या संस्थेचा ताजा अहवाल वाचला, की अगदी दुसरेच चित्र डोळचांसमोर उभे राहते.

नॅशनल सॅंपल सर्व्हे (राष्ट्रीय प्रातिनिधिक पाहणी) हैद्राबाद, ह्यांच्या ताज्या पाहणीनुसार, देशातल्या लोकसंख्येपैकी पस्तीस टक्के जनता ठार दारिद्र्यात खितपत पडून असल्याचे निदर्शनास येते. ह्या अहवालानुसार, ह्या पस्तीस टक्के जनतेला आपला मासिक खर्च अवघ्या १५ रुपयांत (शहरांत हे प्रमाण रु. २४ एवढे आहे) भागवणे भाग पडते. म्हणजेच ४७ कोटी भारतीयांपैकी जवळजवळ १७ कोटी भारतीय वरील प्रकारचे अत्यंत खडतर जिणे जगत आहेत. ह्या पस्तीस टक्के गटाची आणखी विभागणी करायची झाल्यास, ह्यांच्यापैकी जवळजवळ सहा कोटी लोकांचे मासिक उत्पन्न अवघे ११ रु. (शहरांत १५ रु.) आहे आणि जवळजवळ १० कोटी लोकांचे उत्पन्न जेमतेम तेरा रुपयांच्या (शहरांत १८ रु.) घरात आहे. भारतीय जनतेच्या दारिद्र्याचा आणखी भीषण पुरावा म्हणजे, देशातील ऐंशी टक्क्यांहून अधिक लोकांचा प्रतिदिन खर्च एक रुपयाच्या आत आहे; आणि विशेष म्हणजे, १९५२ पासून राष्ट्रीय उत्पन्नात नियमित वाढ होत असूनही व आर्थिक पुनर्रचना चालू असूनही, हे प्रमाण आजतागायत कायम आहे. पस्तीस टक्के दारिद्र्याच्या ह्या गटात केरळचा पहिला नंबर लागतो, आणि तिथल्या एकूण लोकसंख्येच्या ४५ टक्के जनता ह्या गटात मोडते. इतर राज्यांतली परिस्थिती पुढीलप्रमाणे आहे–म्हैसूर ४४ टक्के, आंध्र ४२ टक्के, उत्तर प्रदेश ३९ टक्के, मध्यप्रदेश ३७ टक्के, महाराष्ट्र ३६ टक्के, बिहार ३५ टक्के, राजस्थान ३४ टक्के.

शेतमजुरांचे मासिक उत्पन्न (१९५२ साली) दरडोई रु. ८·७० वरून तेरा वर्षांत अवघ्या एका रुपयाने वाढले. शहरी विभागातल्या औद्योगिक कामगारांचे दरडोई उत्पन्न गेल्या सोळा वर्षांत १२७ टक्क्यांनी वाढले असले तरी त्याच काळात महागाई निर्देशांकांतही जवळ जवळ २०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ह्या हिशेबाने पाहिले तर, दोनशेच्या आसपास पगार मिळवणाऱ्या कामगाराच्या प्रत्यक्ष उत्पन्नात गेल्या १६ वर्षांत अवघी १४ टक्केच वाढ झालेली आहे.

आपल्या पाहणीच्या निष्कर्षात नॅशनल सॅंपल सर्व्हेचा हा अहवाल पुढे म्हणतो की, गेल्या सोळा वर्षांतल्या नित्योपयोगी (Consumer Products) वस्तूंच्या खरेदीवर एकूण भारतीयांनी केलेल्या खर्चाच्या तेहतीस टक्के खर्च देशातल्या साठ

टक्के जनतेने केला आहे तर देशातल्या अवघ्या वीस टक्के जनतेने बेचाळीस टक्के खर्च केला आहे. ह्याचाच अर्थ देशाची सर्व आर्थिक मक्तेदारी देशातल्या अवघ्या एकपंचमांश लोकसंख्येत सामावली गेली आहे, तर बाकीचा जवळ जवळ ८० टक्के समाज आर्थिक गुलामगिरीत पिळून निघत आहे ! ह्या आर्थिक मक्तेदारांचीही छाननी करण्यात आली तर असे आढळून येईल की देशातली सर्व आर्थिक सत्ता एकूण लोकसंख्येच्या अवघ्या तीन टक्के लोकांच्या हातात केंद्रित झाली आहे. भारतीय दारिद्र्याचे आणि दोन समाजांतल्या आर्थिक विषमतेचे अत्यंत दारुण आणि विदारक चित्र ह्या अहवालात उभे केले आहे आणि जाता जाता अगदी सहजपणे भारताच्या आर्थिक नियोजनाचे अपयश हा अहवाल सांगून गेला आहे.

सध्या सर्वत्र राजकीय विकेंद्रीकरणाच्या गप्पा ऐकू येतात. जिल्हा परिषदांचा कार्यक्रम ह्याच पायावर हाती घेण्यात आला आणि ह्याच तत्त्वानुसार साथी जयप्रकाशांनी परवा स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला आपला पाठिंबा असल्याचे, नागविदर्भ आंदोलन समितीला कळवले. परंतु राजकारणाच्या बऱ्याचशा किल्ल्या आर्थिक मक्तेदारांच्या हातात असतात हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. फार काय, साम्यवादी नंबुद्रीपादनासुद्धा बिर्लांचीच मदत घ्यावीशी वाटते. आणि म्हणूनच जोपर्यंत आर्थिक विकेंद्रीकरणाचा कार्यक्रम हाती घेऊन त्याची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत राजकीय विकेंद्रीकरणाच्या गप्पा व्यर्थ आहेत. एकीकडे राजकीय विकेंद्रीकरणाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे, नवनवीन उद्योगधंद्यांचे परवाने आर्थिक मक्तेदारांनाच देऊन त्यांची आर्थिक साम्राज्ये वाढवायला मदत करायची, असले धोरण जोपर्यंत राबवले जाते तोपर्यंत ह्या बडबडींना काही अर्थ नाही. आणि आर्थिक विकेंद्रीकरणाची चळवळ जोर धरून, आर्थिक विषमता जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत, राजकीय-आर्थिक-भाषिक अराजके नुसत्या शांततेच्या आवाहनांनी कमी होणे सुतराम शक्य नाही. आर्थिक गुलामगिरीचे पाश निखळून पडत नाहीत तोपर्यंत विद्यार्थ्यांतले असंतोषही सहजी चिरडले जाणार नाहीत. आणि जोपर्यंत दोन समाजांतली ही भयाण पोकळी रुंदावणे थांबून ती आकुंचित होत नाही, तोपर्यंत कम्युनिस्टांच्या हुकूमशाहीला रोखण्याच्या वल्गना व्यर्थ आहेत.

## असेच पुढे चला !

दिल्लीच्या 'इन्स्टिटयूट ऑफ कॉन्स्टिटयूशनल अ‍ॅण्ड पार्लमेंटरी स्टडीज' ह्या संस्थेच्या विद्यमाने "सर्व भारतीयांसाठी समान कायदा" ह्या विषयावरील परिसंवादाचे उद्घाटन करताना खा. एम्. सी. छगला ह्यांनी प्रतिगामी मुसलमानांवर कडाडून हल्ला चढवला आणि एकपत्नित्वाला विरोध करून सामाजिक प्रगतीला खीळ घालण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचा तीव्र निषेध केला. मुस्लीम–लॉ हा स्त्रीचा

अपमान असून, मुसलमान स्त्रियांनी पाकिस्तानातील स्त्रियांप्रमाणे बुरखे फेकून देऊन, रस्त्यावर यावे व मुसलमानांतील बहुपत्नित्वाच्या रूढींविरुद्ध प्रखर आंदोलन उभारावे असे आवाहन केले आहे. आपल्या भाषणात श्री. छगला पुढे म्हणतात की, "मुस्लीम व्यक्तिगत कायद्यानुसार कोणत्याही मुसलमानास व्याज घेण्यास मनाई आहे. असा एक तरी मुसलमान बँकर किंवा उद्योगपती मला दाखवून द्या की जो व्याज घेत नाही." भाषणाचा समारोप करताना श्री. छगलांनी सांगितले की, "'हिंदू कोड,' 'मुस्लीम कोड' असे भिन्न भिन्न कायदे एकदम रद्द करून, एकच एक 'इंडियन कोड' हा सर्वांना समान लेखणारा कायदा केला जावा व त्याची सक्त अंमलबजावणी केली जावी."

हिंदू किंवा ख्रिश्चन समाजांतल्या धार्मिक आचारविचार व रूढी इत्यादींवर त्याच समाजातल्या बुद्धिवाद्यांकडून व समाजसुधारकांकडून वेळोवेळी कडाडून हल्ले चढवले जातात. त्यामुळे ह्या समाजामध्ये नेहमीच वैचारिक अभिसरण चालू असते; व हे समाज आधुनिक प्रगत समाजांच्याबरोबर यायच्या धडपडीत असतात. परंतु दुर्दैवाने, मुसलमान समाजात असे सुधारक फारसे झालेच नाहीत व कुराणाविरुद्ध बोलण्याची हिंमतही कुणाला झाली नाही. इराण, तुर्कस्थान, पाकिस्तान इत्यादी देशांतल्या हुकूमशाही राजवटींनी राष्ट्रीय दृष्टिकोणातून विचार करून व जनर्निदेची तमा न बाळगता काही सुधारणा घडवून आणल्या. परंतु भारतातल्या काँग्रेसी राज्यकर्त्यांनी मात्र त्यांच्या मताच्या लालसेतून, त्यांच्या समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. मात्र उलटपक्षी, शासनाने व अन्य राजकीय पुढाऱ्यांनीही स्वस्वार्थापायी मुसलमानांच्या ह्या वेगळेपणाला वेळोवेळी खतपाणीच पुरवले व त्यांच्या भावना पेटवून त्यावर स्वपक्षांची पोळीच भाजून घ्यायचे धोरण अवलंबले. ह्या पार्श्वभूमीवर श्री. छगलांचे विचार क्रांतिकारी वाटतात. भारतीय राष्ट्रवादाच्या आत्यंतिक तळमळीतून व्यक्त झालेले वाटतात.

अलीकडे श्री. हमीद दलवाई ह्यांनी 'सेक्युलर फोरम'च्या व्यासपीठाचा उपयोग करून, असेच तडाखेबंद प्रहार मुस्लीम समाजाच्या अंधःश्रद्धेवर, त्यांच्या वेगळेपणावर केले आहेत. मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'नवशक्ति'तून पत्र लिहून कु. यास्मिन लुकमानी, कु. शमा शमीम भगत वगैरे तरुणींनीही अशाच प्रकारचे तीव्र हल्ले स्वसमाजावर चढवले आहेत. मुस्लीम समाज आज जागा होत आहे हेच ह्यावरून सिद्ध होत आहे. हा समाज जागा होऊन त्याने आत्मनिरीक्षणांतून समाजोन्नती साधली व भारतीय राष्ट्रीय प्रवाहाशी स्वतःला एकरूप करून घेतले तर, मला वाटते भारतीय राष्ट्रवादी शक्तींना फार मोठी बळकटी येईल. हिंदू-मुस्लीम ऐक्याचे कृत्रिम प्रयोगही मग करत बसावे लागणार नाहीत. ह्या वरील मंडळींना आवर्जून सांगावेसे वाटते, "थांबू नका! आगे बढो!" ○

नीळकंठ दामले

# मनोगते

मी वय वर्षे २३. तीन-चार वर्षे कॉलेजमध्ये काढलेली. जन्म सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबात. भव्य दिव्य स्वप्ने उराशी बाळगावयाची आणि डोळे उघडावे तर निराशाच पदरी पडावी, ह्या खास प्रकारात मोडणाऱ्या मध्यमवर्गीय तरुणांचा मीही एक प्रतिनिधी; प्रस्थापित व्यवस्थेबद्दल शंका असणारा पण शंकांचे ठाम मतांत रूपांतर न करू शकणारा आणि त्या ठाम मतांसाठी झगडा न करू शकणारा.

'प्रस्थापित' या विशेषणाचे इंजिन असलेल्या गाडीला राज्यव्यवस्था हा एक डबा. विवेकाच्या फिश्प्लेट्स काढलेले रूळ दिसत असताना त्यातून प्रवास करणारी ही मंडळी! अंधुक का होईना, पण पुढील धोक्याची जाणीव कच्छ-लवादाच्या निर्णयाने झाली. पुन्हा एक दिव्य स्वप्न निर्माण झाले होते, पण ते स्वप्न डोळे न मिटता उघड्या डोळ्यांनी पाहावयाचे आता ठरवले होते. सत्याग्रहात भाग घेतला. तुरुंगवास भोगला. ज्या ज्या ठिकाणांहून मिळेल ती माहिती कच्छच्या प्रश्नाबाबत आणि केवळ दुर्दैवी आघातामुळेच जगाला माहीत झालेल्या या मागासलेल्या एकंदर कच्छच्या भूभागाबद्दल मिळवली. आणि आज गेले कित्येक महिने मी कच्छमध्ये आहे. जे काही पाहिले आहे आणि पाहतो आहे त्याने शंकांचे रूपांतर निश्चित मतांत व्हावयाला लागले आहे.

'प्रस्थापित' इंजिनाच्या या गाडीला—वेगाने विनाशाकडे धावणाऱ्या या गाडीला—केवळ राज्यव्यवस्थेचाच एक डबा नाही तर समाजव्यवस्था, धर्म, अर्थव्यवस्था, विचारप्रणाली हेही डबे आहेत. प्रत्येक डब्यातल्या प्रत्येक माणसाला विनाश

दिसत आहे. पण डव्यातून उडी टाकावयाची मात्र त्यांची तयारी नाही.

स्वातंत्र्याच्या आसपास जन्मलेली आमची पिढी. राज्यव्यवस्था आम्ही कोठली पाहिली ? कायदा, न्यायालय, लोकसभा ह्यांच्या प्रयोजनांचे आम्ही काय अर्थ लावावे ? ऐकीव आणि प्रत्यक्ष यांच्यांत चारच बोटांचे अंतर असते. पण एका पिढीचेसुद्धा असते. आणि त्यामुळेच खोटयाचे खरे आणि खऱ्याचे खोटे होत असल्यास आम्ही काय समजावयाचे ? वाचलेल्या इतिहासापेक्षा घडत असलेल्या वर्तमानाचेच पडसाद कायम टिकतात. शाब्दिक वर्णनात वाचलेल्या राक्षसापेक्षा गल्लीतला दारुडयासुद्धा जास्त भयंकर वाटतो.

कच्छ हा भारताचाच भाग. कंजरकोट, छाडबेट, आणि धाराबनी यांच्यावर कच्छच्या महारावांचे राज्य होते. स्वातंत्र्यानंतर इतर संस्थानांप्रमाणे कच्छही भारतात सामील झाले. धाराबनीवर होणाऱ्या उत्तम प्रतीच्या गवताचा ठेका महाराव स्वतःच्या अखत्यारीत एखाद्या ठेकेदाराला देत असत. वर्षाला ठरलेले पैसे देऊन त्या गवताची विक्री त्या कंत्राटदाराने करावयाची. सामील होण्यापूर्वी आणि नंतरसुद्धा १९५५ ते १९५६ पर्यंत हा शिरस्ता चालू होता. कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहेत. कच्छ संस्थानाच्या विलिनीकरणानंतर सीमेच्या आखणीची जरुरी 'मित्रप्रेमा'ने सद्‌गदित झालेल्या भारत सरकारला वाटली नाही, आणि कावेबाज पाकिस्तान सोयीस्करपणे विसरून गेले. १९५६ आणि १९६५ मध्ये कच्छच्या रणावरून युद्धे झाली. दोन्ही वेळेला हा भाग आपला असून त्याच्यावर आक्रमण झालेले आहे असे म्हणून भारताने प्रतिकार केला. हजारो मैलांच्या सपाट रणाच्या पार्श्वभूमीवर उंच असलेल्या या तिन्ही प्रदेशांचे लष्करी दृष्टीने फार महत्त्व होते. ती ठाणी रक्ताने किमत मोजून लढवली गेली. 'आम्ही जगात एकटे राहिलो तरी पर्वा नाही. कंजरकोट, धाराबनी, आणि छाड आमचेच राहील' असे स्वर्गीय लालबहादूर शास्त्रींनी लोकसभेत सांगितले. पण अन्यायकारक लवादाच्या ढालीपाठी आपली घाणेरडी, देशद्रोही प्रवृत्ती लपवून आमच्या सरकारने हे पाकिस्तानला देऊन टाकले. आम्ही फार फिलॉसॉफिक आहोत. आयुष्य हे एक देवाणघेवाणीचा व्यवहार आहे असे आम्ही मानतो. पण आमची देवाण भौतिक आणि घेवाण आध्यात्मिक असते. हजारो तरुण सैनिकांचे रक्त, सामान्य जनतेने केलेला आर्थिक त्याग आणि देशाची सुधारत असलेली अर्थव्यवस्था या देवाणीच्या बदल्यात प्रेम, विश्वशांती आणि भ्रातृभाव एवढेच आम्ही मागितले. जो भ्रातृभाव खऱ्या अर्थाने आम्हांला मिळालाच नाही.

वर उल्लेखलेल्या ठेकेदारीबद्दलचे कागदपत्र महारावांनी स्वतः होऊन लवादासमोर ठेवले. कागदपत्र लंडनलाच अडकले. जिनिव्हाला—जेथे लवादाचे काम चालले होते तेथे—गेलेच नाहीत. नंतर ते हरवले अशी कबुली मंत्र्यांनी लोकसभेला दिली. मुंबईच्या भेळवाल्याला भेळ बांधून द्यावयाला कागद कमी पडले म्हणून का

त्याने जिवाचा आटापिटा करून लंडनला अगर जिनिव्हाला जाऊन हे कागदपत्र पळविले ? सरकारला एकतर या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आले नव्हते किंवा कंजरकोटचे दान द्यावयाचा निर्णय आधीपासूनच घेण्यात आला असला पाहिजे.

कच्छच्या सीमेवर लष्करी सैनिक नाहीत. सीमासंरक्षक दलाची (B.S.F.) कमी प्रतीची शस्त्रे घेतलेली बाहुली सीमेवर उभी असतात. आक्रमणाच्या हलक्या वाऱ्यानेसुद्धा ती आजपर्यंत दोनदा कोलमडून पडली आहेत. सीमा भागात रस्त्याची सोय नाही. B.S.F च्या लोकांना ज्या परिस्थितीत राहावे लागते त्या परिस्थितीला अमानुष असेच म्हणावे लागेल. कारखान्यांतून निरुपयोगी म्हणून फेकून दिलेले भोकाभोकांचे गंजलेले पत्रे वाकवून त्यांचा उपयोग झोपण्यासाठी करावा लागतो. बांधकामाच्या ठिकाणी पाण्याच्या साठवणुकीसाठी वापरली जाणारी हजार ठिकाणी पोचे येऊन बेडौल झालेली पिपे पिण्याचे पाणी साठवण्यासाठी त्या सैनिकांना वापरावी लागतात. विजेची सोय त्यांच्या छावण्यांमध्ये तर नाहीच, पण 'इंडियन ब्रिज'सारख्या अत्यंत महत्त्वाच्या पुलाच्या संरक्षणासाठीसुद्धा नाही. केवढी बचत सरकार करत आहे ! कराडला विमानतळ झाला पण कच्छमध्ये चांगला विमानतळ अजूनही नाही. एक वर्षापूर्वीची ही परिस्थिती. विनंत्या झाल्या, अर्ज झाले. सीमेपासून दूरचे पांढरे कासव काही मैल गेले पण खास पोसलेले ससे अजून आक्रमणाच्या टाचेखाली चिरडण्याच्या क्षणाची वाट पाहत शांतपणे पहुडलेलेच आहेत. अजूनही संरक्षणाचे गाडे कच्छच्या सीमेवर रेंगाळत आहे.

जनतेसमोर या गोष्टी आणण्यासाठी छायाचित्र घ्यायला जावे तर संरक्षण कायद्याच्या बडग्याने कॅमेऱ्याचा चक्काचूर होतो. परिस्थिती लोकांसमोर यावी म्हणून तोंड उघडावे तर 'In the interest of nation'चा बोळा पोलिसी लाठीच्या टोकाने आमच्या तोंडात खुपसण्यात येतो. पण हीच लाठी पाकिस्तानसमोर मात्र भाईभाईंचे बॅनर लावण्यासाठी उपयोगात आणली जाते. हाच कायदा आंतरराष्ट्रीय मंचावर अन्यायाचे ओरखडे आणि रक्ताचे डाग लपविण्यासाठी टेबलक्लॉथ म्हणून वापरण्यात येतो. सगळ्या गोष्टी दुसऱ्यांसाठी, परक्यांसाठी. आम्हांला मात्र अंगठा.

घटनेला बगल देऊन कच्छ सत्याग्रहात कच्छच्या आणि सर्व देशाने प्रकट केलेल्या मताला डावलून लोकसभेत सरकारने हा प्रश्न आणलाच नाही. सर्वोच्च न्यायालयातल्या रिट् अर्जाच्या Affidavit मध्ये हा प्रदेश आमचा नव्हताच, असे सरकारतर्फे सांगण्यात आले.

**आपल्या नसलेल्या प्रदेशासाठी आम्हांला का बलिदान करायला लावले गेले ? पाकिस्तानवर एकदा नव्हे तर दोनदा आपण आक्रमण केले असाच त्याचा अर्थ नाही का ? नंतरसुद्धा 'खोटचा' केससाठी**

**जिनिव्हामध्ये लाखो रुपये खर्च करून त्या. बेब्लर यांना मूर्ख का बनवण्यात आले ? प्रच्छन्न देशद्रोही कारवाया करणाऱ्या, आपल्या प्रदेशाचे दान करण्याचा मनसुबा करून जवानांचा** Cold blooded **खून करणाऱ्या या सरकारवर आम्ही का विश्वास ठेवावा ?**

आमच्यापुढे काय आदर्श ठेवण्याचा प्रयत्न या व्याख्यानबाज 'हरिश्चंद्रां'च्या अवतारांनी केला आहे ? देशाचा, जनतेचा बळी दिला म्हणजे मोठेपण मिळते असेच याच्यातून ध्वनित होते ना ! मग मन मानेल त्या मार्गाने ह्या प्रस्थापित सरकारच्या विध्वंसनाचे व्रत आम्ही घेतले तर त्यात काय चुकले ?

माणसासारखा माणूस. पण हरिजन म्हणून त्याला 'भूज'च्या भर बाजारातल्या हॉटेलात चहा प्यायला दिला जात नाही. 'खापर' गावात तो हॉटेलात दिसला म्हणून त्याच्यासकट त्या हॉटेलचे मालकालासुद्धा मारहाण करण्यात येते.

माझ्या घराजवळच असलेल्या हरिजनवासात एका हरिजन बंधूची ८-१० वर्षांची मुलगी तापाने फणफणून बेशुद्ध होती. केवळ हरिजनाची मुलगी म्हणून डॉक्टर घराचा उंबरठा ओलांडावयास तयार नाही. बावापुता केल्यावर ५०० रुपये ठेवा तर हात लावतो ही अट. एवढे पैसे एकदम कोठून मिळणार ? जेवढे होते तेवढे २५०-३०० रु. त्या गृहस्थाने दिले आणि उरलेले उद्या देतो म्हणाला. आंबट तोंडाने कपाळाला


मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक**
**फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई-२८

आठ्या घालून डॉक्टरने काय औषध दिले, कोण जाणे ! पुरेशी तपासणी न करताच, तो बाहेर पडतो न पडतो तोच मुलगी वारली. केवळ कमी पैसे मिळतात म्हणून मुलीचा बळी घेणाऱ्या या डॉक्टरला आमच्या समाजव्यवस्थेने पोसला आहे. स्वतःला पोलादी पुरुष म्हणवणारी, उच्च संस्कृतीचा वारसा आपल्याकडेच आहे असे म्हणणारी, अखिल मानवीय कल्याणाचा वसा घेतलेली ही मंडळी त्या डॉक्टराला रोखू शकत नाहीत. त्या हरिजनाचे अश्रू पुसू शकत नाहीत.

सरहद्दीला लागून असलेल्या या प्रदेशात दर आडवर्षी दुष्काळ येतो. माणसे आणि गुरेढोरे मोठ्या प्रमाणावर मरतात. इथले लोक अशिक्षित आहेत. गरीब आहेत, म्हणून दारिद्र्याबरोबरच परकीय आक्रमणाच्या छायेत ते वावरत असतात. आम्हा भारतीयांना त्याबद्दल काहीच खंत वाटत नाही. चार खोटे अश्रू ढाळून पुन्हा आपल्या नफ्याच्या चिंतेत गर्क होणारी मंडळी जास्त. समाजात त्यांना मान आहे. चीनबरोबरच्या युद्धाच्या वेळी राष्ट्रीय संरक्षण फंडाला आपले अनक दिवसांचे उत्पन्न गरिबांनी दिले. खचितच काही दिवस उपाशी राहावे लागले असेल त्यांना. त्यांनी याची पर्वा केली नाही. पण कायद्याचा बडगा त्यांनाच दाखवण्यात येतो. आध्यात्मिकतेचे पाठ व्यासपीठावरून त्यांनाच देण्यात येतात. संरक्षणनिधीत ज्यांच्या नावांवर काहीही रकमा दिल्याची नोंद नाही, उलटपक्षी, युद्धवस्तू उत्पादन आणि युद्धाचे परिणाम यांतूनच फायदा मिळवणारे अनेक लोक मात्र मानसन्मानाची लेणी मिरवत आहेत. समाज त्यांना मान देतो आहे. उद्घाटनाला बोलावत आहे. प्रामाणिकपणाची फीत कापून अप्रामाणिकपणाला आपल्या वास्तूत प्रवेश देतो आहे.

पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या समितीचेच अध्यक्ष परिस्थितीचा फायदा घेऊन तेलाच्या साठ्याचा कब्जा घेतात आणि किंमती दुप्पट करतात. अनेक संस्थांच्या अध्यक्षपदांचे हार त्यांच्याच गळ्यात. दुष्काळात गरिबांना त्यांच्या गुरांसाठी गवत देण्याची योजना. ते गवत मिळाले नाही तर हजारो गाईगुरे आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या माणसांची उपासमार होणार ! याच गवताची साठेबाजी करून आज ते दुप्पट भावाने विकले जात आहे. त्या गरिबांच्या प्राणांचाही व्यापार करू पाहणारी ही माणसे. पुन्हा त्यांना रोखावे असे कोणालाही वाटत नाही. मानमरातब त्यांनाच !

दुष्काळाने प्राणहानी होणे हा कच्छचा स्थायीभाव. त्यालाच लागून असलेल्या सौराष्ट्रात राजकोटला लक्षावधी मण अन्न आहुती म्हणून यज्ञामध्ये जाळले जाणार ! हे महत् कार्य करणाऱ्या संतांच्या पायांवर डोके ठेवण्यासाठी कोण धडपड ! समाज या संतांनाच शिरोधार्य मानतो.

धर्माची कसोटी आम्ही कोठल्या निकषावर लावायची ! न उलगडणाऱ्या कोड्यांची सांगड घालताना, स्वतःचा बुद्धिवाद ज्या वेळी तोकडा पडतो त्या वेळी

[पृष्ठ ६२ वर]

## □ पाप्यांनाच भविष्यकाळ असतो ! जयहिंद !!

विरोधी पक्षांतील आमदार पळविण्याची परंपरा थोर आहे. १९६७ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेसला फक्त १९८ जागा मिळाल्या होत्या, परंतु सुचेता कृपलानीबाईंनी प्रजासमाजवादी पक्षाचे गेंडासिंग आदी काही आमदार पळवले व राज्य सुरू केले. त्यापूर्वी जवाहरलाल नेहरूंनी अशोक मेहतांना पळवले होते, स. का. पाटलांनी पट्टणथानू पिल्ले यांना पळवले होते. काँग्रेसने प्रजासमाजवादी पक्षातील मंडळी पळवायची व राज्य करायचे ही गोष्ट हळूहळू जनतेच्या अंगवळणी पडून गेली होती. या योजनेत देशाचे खूपच हित होते. एक निरुपयोगी पक्ष निकालात निघत होता; आणि देशाला प्रांताप्रांतांतून स्थिर सरकारे लाभत होती. परंतु काही लोकांना हे पाहवले नाही. प्रथम वीरेंद्रसिंग, नंतर चरणसिंग आणि शेवटी गोविंद नारायणसिंग या तीन सिंगांनी काँग्रेसला दगा दिला. अशा रीतीने या ' सिंगर ' मंडळींनी राजकारणाची ' चाल ' बदलून टाकली.

मामला गंभीर होताच व देशात प्रांताप्रांतांतून स्थिर सरकारे राहावीत व फुटून जाणाऱ्या ' रामभाऊं 'चा कायम बंदोबस्त करावा यांसाठी लोकसभेने एक समिती नेमली. १९ सभासदांच्या या समितीचे अध्यक्ष झाले श्री. यशवंतराव चव्हाण. स्वतंत्र पक्षाचे रंगा, बलराज मधोक, भूपेश गुप्ता, जयप्रकाश नारायण, मधू लिमये, डी. एम. के. चे अनबझगन, शिवाय राम सुभगसिंग सेटलवाड, एन. सी. चतर्जी अशी थोर थोर मंडळी समितीत घेतली गेली.

या समितीने एकमताने काही निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नव्हतीच. कारण ज्यांचे कुठल्याही प्रश्नावर जन्मात पटणे शक्य नाही, अशांनी एकत्र बसून चहा-

चिवडा खाल्ला की, एकमुखी निर्णय लागेलच असे नाही. परंतु विवाद्य प्रश्नावरील सर्वपक्षीय सभा जशा विनोदी होतात तशीच ही समिती म्हणून सर्वांनी तिचे स्वागत केले.

समितीच्या सहा बैठकी झाल्या. या सर्व बैठकींना हजर होते ते फक्त यशवंतराव चव्हाण आणि डॉ. कुंझरू ! बाकी मंडळी कुणी दोन कुणी तीन बैठकीस आली. काय ही अनास्था !

समितीत सर्व काँग्रेसविरोधक एक झाले आणि त्यांनी बूट काय काढला, तर म्हणे मध्यवर्ती सरकारात फक्त ५० व प्रांताच्या मंत्रिमंडळात विधानसभेच्या सभासद संख्येच्या फक्त १० टक्केच मंत्री असावेत ! अर्थात चव्हाण आदी मंडळींनी याला कसून विरोध केला. या सूचनेमागे हेतू हा होता की, इंदिरा गांधींचे हात बांधून टाकावेत. मध्यवर्ती मंत्रिमंडळाच्या संख्येत वाढ केल्याने आज सर्व मंडळी आनंदात आहेत त्या आनंदावर विरजण घालणे. खूप चर्चा झाली. शेवटी ठरले काय ? अहवालात समितीने सांगितले आहे–

" राजकीय पक्षांतराला आळा घालता येईल, असा एकही खात्रीचा उपाय नाही. यासाठी ज्या त्या पक्षाने आपआपले उपाय योजावेत. "

खरे म्हणजे हे ठरवायला समिती नेमण्याची गरज होती का ? परंतु आम्ही म्हणतो, नेमली म्हणून काय बिघडले ? हा क्षुद्र निर्णय, समितीमुळे कसा आता ' भारदस्त ' वाटतो.

समितीच्या कामातून सदस्य मोकळे होतात न होतात तोच बिहारमध्ये पेचप्रसंग निर्माण झाला. मुदतपूर्व निवडणुकीत ३१८ जागांपैकी काँग्रेसला बिहारात फक्त ११८ जागा मिळाल्या असल्याने, तिथे काँग्रेसचे नेतृत्व एखाद्या राजकारणी धुरंधर माणसाकडे देणे इष्ट होते. इंदिराजींनी ना. चव्हाणांना सांगितले–" यशवंतराव, बिहारला जा ! नेता निवडणूक तुमच्या देखरेखीखाली होऊ दे... ! "

ना. चव्हाण पाटण्याला गेले. काँग्रेस आमदारांची बैठक भरली. ना. चव्हाण प्रमुखस्थानी बसले. चव्हाणांनी विचारले–

" या ११८ मंडळींत सिंग कोण आहे ?"

एक सत्तरीच्या घरात गेलेला वृद्ध उभा राहिला. म्हणाला– " चव्हाणसाहेब, माझं नाव हरिहरसिंग ! या सर्वांत जुन्यांत जुना असा मी एकच सिंग आहे. ३६ वर्षं मी काँग्रेसमध्ये होतो ! "

ना. चव्हाण जरा पेचात पडले. गेली काही वर्षे हा महान् मानव कुठे हरवला होता, हे त्यांना कळेना. त्यांनी सांगितले–

" जमलेल्या मंडळींना तुमची थोडक्यात माहिती सांगा ! आपण वयोवृद्ध

आहातच. ज्ञानवृद्ध आणि सत्तावृद्धही असाल तर आपली एकमतानं निवड करणं सोपं जाईल. . . "

हरिहरसिंग म्हणाले–" मी बसून बोलतो, मला फार वेळ उभं राहवत नाही. वयानुरूप आता दिसतंही कमी. महत्त्वाचं काही असलं तर ऐकू येतं, नाहीतर ती बाजूही जरा गंभीर झाली आहे. "

इतके सांगून वयोवृद्ध सिंग म्हणाले–

" १९५७ साली मी काँग्रेसकडं तिकिट मागितलं होतं, परंतु मला पक्षानं तिकिट दिलं नाही. मी त्या वेळी काँग्रेसविरुद्ध निवडणूक लढवली. दोन वर्षांनी मी काँग्रेसचा त्याग केला व बिहारात स्वतंत्र पक्ष स्थापन करून मी त्याचा नेता झालो. . . "

" म्हणजे तुम्ही मांडवलदारांच्या कळपात फिरून आलेले आहात. . . ! " यशवंतराव.

" चांगली दोन वर्षं त्यांचं कार्य करीत होतो. १९६२ साली माझी सेवा लक्षात घेऊन स्वतंत्र पक्षानं मला तिकिट दिलं. काँग्रेसविरुद्ध उभा राहिलो, परंतु दुर्दैवानं पुन: पडलो. माझ्या हे लक्षात आलं की स्वतंत्र पक्षात काही दम नाही. जमलं तर पुन: काँग्रेसमध्ये जाऊ. परंतु तोपर्यंत अपक्ष राहणंच श्रेयस्कर. स्वतंत्र पक्ष सोडला. १९६७ साली सत्तरीच्या घरात आलो असतानाही, काँग्रेसविरुद्ध निवडणूक लढवली. या वेळी मी यशस्वी झालो. महामाया प्रसाद सिंहा यांच्या मंत्रिमंडळाला पाठिंबा दिला व संयुक्त विधायक दलात सामील झालो. महामाया प्रसादांना माझी थोरवी कळलेली नाही, हे लक्षात आलं. शोषितदल सत्तेवर येणार होतं. शोषित-दलात सामील झालो व हा गट संयुक्त विधायक दलातून फुटताच महामाया प्रसाद कोसळले. आम्ही अखेर मंत्री तर झालो ! आमचं कर्तृत्व आता काँग्रेसच्या लक्षात आलं. आमचं मंत्रिमंडळ महिन्याभरात कोसळलं. मुदतपूर्व निवडणुका झाल्या. आम्ही काँग्रेसकडं या वेळी खडा टाकला. चव्हाणसाहेब, या हरामखोरांना आता माझी किंमत कळली. "

सभेत गलका सुरू झाला. चव्हाणांनी हात वर करून शांतता प्रस्थापित केली व हरिहरसिंगांना म्हणाले–

" सिंगजी, आपण आता काँग्रेसमध्ये आलेले आहात. तुमचा या मंडळींवर राग आहे; परंतु आता त्यांना हरामखोर म्हणणं ठीक नाही. "

हरिहरसिंग म्हणाले–" चव्हाणसाहेब, आपली इच्छा लक्षात घेऊन ' हरामखोर' शब्द मागे घेतो, परंतु अर्थ विसरू नका. सांगायचं तात्पर्य, मला या वेळी या मंडळींनी तिकिट तर दिलंच आणि आता सर्वजण मागं लागले आहेत की–तुम्हीच आमचे पुढारी व्हा ! "

ना. चव्हाणांना मुदतपूर्व निवडणुकीपूर्वी भरलेली मध्यवर्ती निवडणूक समितीची बैठक आठवली. समितीपुढे मोठा पेच होता. पक्षांतर केलेल्यांना तिकिट द्यायचे नाही, असे नक्की ठरले होते. बिहारच्या यादीत दोन नावे अशी होती की, ज्यांना तिकिट द्यायलाच नको होते. एक हरिहरसिंग आणि दुसरे प्राध्यापक महावीर प्रसाद यादव ! घनघोर चर्चेनंतर प्राध्यापकांना तिकिट नाकारण्यात आले. कारण विद्येचा उपासक हा अप्रामाणिक असणे ही फारच गंभीर गोष्ट होती. परंतु हरिहर-सिंग हे राजकारणी असल्यामुळे 'वारांगनेव' असणे साहजिक होते. त्यांना मात्र तिकिट देण्यात आले.

श्री. हरिहरसिंगांनाच नेता म्हणून का निवडून द्यावे यासंबंधी ना. चव्हाणांनी जमलेल्या कॉंग्रेस आमदारांना सांगितले–

"हरिहरसिंग हे वयोवृद्ध आहेतच. शिवाय ते सत्तावृद्धही आहेत. ते वयानं वृद्ध असले तरी मी त्यांना वृद्ध समजत नाही. कॉंग्रेसचं नेतृत्व तरुण रक्ताकडं जायला पाहिजेच आहे आणि माझी अशी खात्री आहे की, हरिहरसिंग हे सत्तरी ओलांडलेले असले तरी नेहरूंप्रमाणं किंवा शेलारमामांप्रमाणं त्यांचं रक्त तरुणच आहे. (टाळ्या). पाप्यांनाच भविष्यकाळ असतो–Sinners have future, Saints have only past–अशी एक इंग्रजी म्हण आहे. याचा अर्थ असा की, पश्चात्ताप झालेला मनुष्य अधिक कार्यक्षम असतो. ते पुन्हा कॉंग्रेसमध्ये आलेले आहेत, आपण त्यांचं मनापासून, प्रेमानं, भावानं भावाचं करावं तसं स्वागत करू या, त्यांना आपण सांगू की, हरिहरजी, तुम्ही आमचे नेते व्हा. पक्षांतर का होतं ते तुम्ही जाणता, त्याचे दुष्परिणाम तुम्ही जाणता, मंत्री होण्यासाठी काय करावं लागतं हे तुम्ही जाणता– तुम्ही पुढं चला आम्ही तुमच्या मागं येतो !"

श्री. हरिहरसिंग यांची बिहारच्या कॉंग्रेस संसदीय पक्षाचे नेते म्हणून एकमताने निवड झाली. नंतर 'जनमनगण' होऊन हा गोड समारंभ संपला ! जयहिंद !!!


# पुरंदऱ्यांची दौलत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे २

## □ शिते आणि भुते !

चालू वर्षात भारताची अन्नपरिस्थिती खूपच सुधारली आहे. गतवर्षीपेक्षा सुमारे दोन मिलियन टन एवढे धान्य आपण अधिक पिकवलेले आहे. सुमारे एक कोटीहून अधिक 'कार्यक्षम' माणसांना चंद्रशेखर यांनी 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' हा संदेश ऐकवलेला आहे. १९७५ साली—"कुटुंब कशाला ? सुख उशाला !" हा संदेश देण्याची गरज येऊ नये अशी आशादायक परिस्थिती आहे. यामुळे आम्हांला अशी भीती वाटली की, पी. एल. ४८० योजनेमार्फत अमेरिकेतून होणारा धान्य पुरवठा आता बंद करण्याचे सरकार ठरवते की काय ? परंतु मध्यवर्ती सरकारच्या अन्न-खात्याने आता असे जाहीर केले आहे की, यंदाच्या वर्षी ४,००,००० टन तांदूळ परदेशातून आणल्याशिवाय आम्ही राहणार नाही. याचे कारण असे की, अन्नोत्पादन जरी वाढले असले तरी या अधिक उत्पादनाचा ताबा घेणे केंद्र सरकारला शक्य होत नाही. त्या त्या प्रांतातली मंडळीच आता अधिक धान्य खाऊ लागली आहेत. बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या प्रांतांतून यंदा इतर तुटीच्या प्रांतांना काहीही मिळणार नाही व वाढलेले सर्व धान्य ते स्वतःच आपल्या आपल्या प्रांतात खाणार आहेत. आंध्र प्रदेशाने गतवर्षी इतर प्रांतांना देण्यासाठी म्हणून मध्यवर्ती सरकारला ४,००,००० टन धान्य दिले. परंतु यंदा त्यांनी परिस्थिती पाहून काहीही देता येणार नाही, असे कळवले आहे. जोपर्यंत अमेरिका आपल्याला धान्य देते आहे, तोपर्यंत प्रत्येक प्रांताने आपापल्यापुरतेच पाहावे हेच इष्ट होय. ज्या दिवशी अमेरिका सांगेल की, यापुढे शिते मिळणार नाहीत, तेव्हा ही प्रांतीय भुते गाडण्याचा विचार करावा. परंतु अशी पाळी येईल असे आम्हांस वाटत नाही; कारण धान्याचे पैसे आपण रुपयाच्या चलनात देऊ अशी अट घातली आहे. परकीयांचे असे लक्षावधी रुपये भारतात पडून आहेत. या रुपयांचा अमेरिकेत उपयोग नाही, याकरता हे पैसे भारतातील परकीय मिशनऱ्यांना वाटण्यात येतात. यामुळे परकीय मिशनरी भारतात विपुल प्रमाणात येतात व ते आपली सेवा करतात, हा आपला दुसरा फायदा अन्नाहून महत्त्वाचा आहे. सर्व दृष्टींनी विचार करता परदेशांतील शिते बंद करणे आपल्या फायद्याचे नाही. परकीय धान्य मदत अखंड चालू ठेवण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो.

—ग्यानबा



ट्रॅक्टर आणि बॉयलर

चंद्रशेखर मराठे

# धान्य-उत्पादनाची स्थिती

अर्थसंकल्पापूर्वी सादर झालेल्या १९६८-६९ या वर्षीच्या आर्थिक पाहणीनुसार १९६८-६९ या सालात ९ कोटी साठ लाख टन धान्य-उत्पादन झाले, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. नवीन शेतीधोरण व अनुकूल पाऊसपाणी या दोहोंस या प्रगतीचे श्रेय जाते. १९६७-६८ साली ९ कोटी ५६ लाख टन धान्य-उत्पादन झाले होते. १९६८-६९ सालात धान्य-उत्पादनाची ही पातळी टिकून राहिली, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

नवीन शेतीधोरण कितपत यशस्वी झाले, याची काही ढोबळ गमके आहेत. नैट्रोजनयुक्त खतांचा वापर १९६४-६५ साली ४ लाख ५१ हजार टन होता तो १९६७-६८ साली १२ लाख ३५ हजार टन झाला. १९६८-६९ मधील हा आकडा १७ लाख टनांचा आहे. तसेच फॉस्फेटयुक्त खतांचा वापर १९६४-६५ साली १ लाख ४५ हजार टन होता, तो १९६८-६९ साली ६ लाख ५० हजार टनांवर गेला असावा, असा अंदाज आहे. पोटॅशच्या वापरातही वरील काळात ५७ हजार टनांवरून २,८०,००० टनांपर्यंत वाढ झाली.

१९६४-६५ (या वर्षी हवामान अपवादात्मकरीत्या चांगले होते.) सालातील धान्य-उत्पादनाशी तुलना करता १९६८-६९ सालातील धान्य-उत्पादन ७·४ टक्क्यांनी जास्त भरते. १९४९-५० ते १९५१-५२ या तीन वर्षांचा काळ आधारभूत धरून धान्य-उत्पादन वाढीचे प्रमाण काढले तर ते प्रतिवर्षी मागील वाढीपेक्षा तीन टक्के जास्त (कॉम्पाऊंड अॅन्युअल ग्रोथ रेट) भरते.

१९६७-६८ सालातील भरघोस धान्य-उत्पादनामुळे दरडोई अन्न उपलब्धता वाढली १९६५ मध्ये असलेले दररोज दरडोई ४७४ ग्रॅम्सचे हे उपलब्धता-प्रमाण १९६७ मध्ये ३९६ ग्रॅम्सवर येऊन ठेपले होते. लागोपाठ दोन वर्षांचा दुष्काळ याला कारणीभूत होता. १९६८ मध्ये हे प्रमाण ४५७ ग्रॅम्सवर गेले. म्हणजे १९६७ पेक्षा १५ टक्क्यांनी वाढ झाली. मात्र १९६५ वा त्यापूर्वीच्या कोणत्याही चांगल्या वर्षापेक्षा हे प्रमाण फारसे जास्त नाही.

धान्य-उत्पादनातील गेल्या चार-पाच वर्षांतील चढउतार खालील तक्त्यावरून दिसून येईल.

आकडे दशलक्ष टनांचे

| | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ |
|---|---|---|---|---|
| तांदूळ | ३९·० | ३०·७ | ३०·४ | ३७·९ |
| गहू | १२·३ | १०·४ | ११·४ | १६·६ |
| ज्वारी, बाजरी वगैरे | २५·३ | २१·१ | २४·१ | २८·९ |
| एकूण प्रमुख धान्ये | ७६·६ | ६२·२ | ६५·९ | ८३·४ |
| कडधान्ये व द्विदल धान्ये | १२·४ | ९·८ | ८·३ | १२·२ |
| एकूण धान्य-उत्पादन | ८९·० | ७२·० | ७४·० | ९५·६ |

देशातील निरनिराळ्या राज्यांत किती धान्य-उत्पादन होते याची कल्पना खालील तक्त्यावरून येईल.

| राज्य | १९६६-६७ अखेरच्या पाच वर्षांतील सरासरी वार्षिक धान्य-उत्पादन (लाख टनांत) | देशाच्या धान्य-उत्पादनाशी प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ७१·९६ | ९·१ |
| आसाम | १८·६० | २·३ |
| बिहार | ६७·५० | ८·५ |
| गुजराथ | २४·९२ | ३·१ |
| हरियाना | २२·९२ | ३·१ |
| जम्मू व काश्मीर | ५·६० | ०·८ |
| केरळ | ११·१५ | १·४ |
| मध्य प्रदेश | ८२·५६ | १०·४ |
| महाराष्ट्र | ६२·२४ | ७·८ |
| म्हैसूर | ४१·६१ | ५·२ |
| ओरिसा | ४४·२० | ५·६ |
| पंजाब | ३८·१६ | ५·२ |
| राजस्थान | ४५·१० | ५·७ |
| तामीळनाडू | ५६·३० | ७·१ |
| उत्तर प्रदेश | १३२·७७ | १६·७ |
| पश्चिम बंगाल | ५५·६० | ७·०० |

१९६७-६८ सालामध्ये ६·०३ दशलक्ष हेक्टर जमीन सुधारलेल्या बियाणाखाली आणण्यात आली. पैकी १·७८ दशलक्ष हेक्टर तांदळाखाली व २·९४ दशलक्ष हेक्टर

जमीन गव्हाखाली होती. १९६८-६९ सालात ८·५ दशलक्ष हेक्टर जमीन सुधारलेल्या बियाणाखाली आणण्याचे उद्दिष्ट होते. त्याचप्रमाणे एकाच जमिनीत अनेक पिके घेण्याच्या प्रयत्नाखाली १९६७-६८ सालात ३ दशलक्ष हेक्टर जमीन आणली गेली तर १९६८-६९ सालात हे उद्दिष्ट ६·१ दशलक्ष हेक्टरचे होते.

१९६८ सालात ५७ लाख टन धान्याची आयात झाली. अंतर्गत साठा व आयात धान्य यांपैकी ३१ मार्च १९६९ अखेर सरकारजवळ ३५ लाख टन धान्य शिल्लक राहील, असा अंदाज आहे. रब्बी पिकातील धान्यसाठा व पी. एल. ४८० खालील २३ लाख टन आयात धान्य जमेस धरता जून १९६९ अखेरपर्यंत सरकारजवळ ५० लाख टनांचा धान्यसाठा राहील.

१९६९-७० सालात १०·९ दशलक्ष हेक्टर जमीन सुधारलेल्या बियाणाखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेखाली धान्य-उत्पादनाचे वार्षिक उद्दिष्ट १२० दशलक्ष टनांचे ठेवण्यात आले आहे. मात्र धान्य-उत्पादनाची पातळी समाधानकारक प्रमाणांत स्थिर होईतो धान्य आयात करावीच लागेल, असे सरकारी तज्ज्ञांचे मत आहे.

अन्नधान्याचे उत्पादन १९६७-६८ सालात मागील वर्षापेक्षा २८·८ टक्क्यांनी वाढले. १९५०-५१ शी तुलना करता ही वाढ ६० टक्के भरते. या भरीव वाढीमुळे अन्नधान्याच्या घाऊक किमती गतवर्षापेक्षा २४ अंशांनी (सुमारे १० टक्क्यांनी घटल्या.) किमतपातळी मागील वर्षापेक्षा कमी राहण्यात धान्याच्या घटलेल्या किमतींचा वाटा मोठा आहे. पुढील दोन शेतीवर्षांत धान्य-उत्पादन अपेक्षेप्रमाणे वाढले तर धान्य किमती याच पातळीवर स्थिर राहतील असा अंदाज आहे.

○

की सुरेख बारा चित्रे घ्या



Agfa

क्लिक III

खरेदी कराल त्याच दिवशी मित्र छायाचित्रकारांचा पहिला निश्चयमत्रा

* फक्त रोखा नि करा क्लिक. लावायला नको. चूक होण्याची धास्ती नाही.
* '१२०' च्या रोलवर १२ मोठी (६×६ सें.मी.) छायाचित्रे.
* सोयिस्कर आच्छादन, पोर्ट्रेट लेन्स व फ्लॅशगन पाहिजे असल्यास जादा आकार.

आगफा यांच्या देखरेखीखाली दि न्यु इन्डिया इन्डस्ट्रीज लि. बडोदे, यांनी तयार केला



चमकदार फोटो व एन्लार्जमेंटसाठी आगफाच्या फोटो पेपरच वापरा.

AGI

प्रमुख विक्रेते:

आगफा-गेव्हार्ट इन्डिया लिमिटेड

मुंबई • नवी दिल्ली • कलकत्ता • मद्रास

CMAG-117-203



दिनांक २५ जानेवारी १९६९ च्या 'माणूस'च्या अंकात "डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने" हा श्री. दाभोळकरांचा लेख व त्यातील मुलाखती वाचल्या. त्यांतील काही गोष्टी मनाला पटल्या नाहीत. डॉ. दवे ह्यांनी वस्तुस्थितीचे यथार्थ चित्रण केले आहे. परंतु बाकीच्या लोकांनी "तरुण पिढी"लाच दोष दिला आहे. भारतातील तरुण, होतकरू शास्त्रज्ञ अमेरिकेत जाऊन स्थायिक होतात ह्याचे मुख्य कारण पैसा नाही, हे डॉ. दव्यांनीही सांगितले आहे. कामत म्हणतात की संशोधन करणाऱ्याला भारतातही वाव आहेच. ह्याची ग्वाही म्हणून ते स्वतःचे उदाहरण देतात. ह्या ठिकाणी काही गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे.

संशोधन दोन प्रकारचे असते. (Fundamental) ज्याला असामान्य बुद्धिमत्ता व काम करण्याचे स्वातंत्र्य (Liberty to work out own ideas) ह्यांची

# / / / तरुण पिढीलाच दोष देणे

जरुरी असते. पैकी आपल्या देशातील तरुणांकडे असामान्य बुद्धिमत्ता आहे, हे डॉ. खोराना, डॉ. जयंत नारळीकर इत्यादी प्रकरणांवरून सिद्ध झालेच आहे. प्रश्न आहे तो स्वातंत्र्याचा. आवश्यक ते स्वातंत्र्य मिळाले नाही तर आपल्या कल्पना पडताळून पाहता येत नाहीत आणि कार्यालयाचे (Institute) कामकाज सांभाळूनही, जर आवश्यक स्वातंत्र्य दिले गेले, तरुण पिढीला उत्तेजन दिले गले तर परदेशी जाऊन स्थायिक होणारांचे प्रमाण बरेच कमी होईल, ह्यात शंका नाही.

श्री. दाभोळकर म्हणतात की, भारतातील संशोधनक्षेत्रातील जागा वृद्ध शास्त्रज्ञ अडवून बसले आहेत. परदेशांत शास्त्रज्ञ वृद्ध झाला म्हणून तो कार्यनिवृत्त होत नाही. उलट तरुण पिढीला प्रोत्साहन देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे कार्य करतो आणि नेमकी ह्याच गोष्टीची भारतात उणीव आहे. हाताखालच्या माणसाचे

सुधीर कामत

२५ जानेवारीच्या अंकातील 'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' या श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या लेखावर निराळ्या दृष्टिकोणातून केलेली चर्चा...

संशोधन आपल्या नावावर प्रसिद्ध करण्यातच आमचा हातखंडा आहे. तरुण पिढीला आवश्यक स्वातंत्र्य न देण्यामागे "दुर्बल आत्मविश्वास" (Inferiority Complex) हे एक कारण असू शकेल. एखाद्या हाताखालच्या तरुणाच्या उच्च दर्जाच्या संशोधनामुळे आपण निष्प्रभ ठरू, अशी त्यांना भीती वाटत असेल. पण त्यात त्यांचाच गौरव असतो हे त्यांच्या लक्षात येत नाही.

श्री. दाभोळकर लिहितात की, "डॉ. खोरानांना भारतात नोकरी मिळत नव्हती हे साफ खोटे आहे...स्वतःच्या स्विस बायकोला भारतात राहावयास आवडत नाही म्हणून त्यांनी नोकऱ्या नाकारल्यात..."

नोकरी मिळत होती किंवा नव्हती हा वाद गौण आहे. डॉ. खोराना स्वतःच्या स्विस बायकोला भारतात राहावयास आवडत नव्हते म्हणून येत नाहीत, हे दाभोळ-

# योग्य आहे का? ? ? ? ? ? ?

करांना कसे कळले मला माहीत नाही. डॉ. खोरानांनी स्वतः सांगितले असेल तर गोष्ट वेगळी. नसेल तर एका श्रेष्ठ भारतीय शास्त्रज्ञाबद्दल अफवा पसरविण्यास ते मदत करीत आहेत असे मी म्हणेन. डॉ. दव्यांनीही डॉ. खोरानांची ह्याबाबतची मते अप्रत्यक्ष रीत्या दिलेली आहेत. डॉ. जयंत नारळीकरांच्या बाबतीत तर असे कारण नाही ना? तरी ते परदेशात स्थायिक का झाले? ह्याच्याही पुढे जाऊन मला असे म्हणावेसे वाटते की, ह्या शास्त्रज्ञांनी कोठेही राहिले तरी काय बिघडले? त्यांचे संशोधन Fundamental असल्यामुळे भारताचे फारसे नुकसान होतच नाही. आणि आज आपल्याला गरज आहे Applied संशोधनाची, की ज्या योगे आपण पर्यायी कच्चा माल देशात मिळवू अथवा आमच्याकडील कच्च्या मालातून पक्का माल निर्माण करू शकू. ह्या Applied संशोधनामध्ये परदेशी स्थायिक झालेले

शास्त्रज्ञ गती दाखवू शकतीलच असे नाही.


दुसरी गोष्ट, टीका करताना वैयक्तिक पातळीवर येऊ नये असे मला वाटते.

"संशोधन स्वातंत्र्या "चा प्रश्न जेथे येतो तेथे तेथे काही गोष्टी स्पष्ट कराव्याशा वाटतात.

ज्या "सिबा रिसर्च सेंटर "मधील व्यक्तींच्या मुलाखती लेखकाने घेतलेल्या आहेत, तेथे आज काय परिस्थिती आहे ? जास्त पगाराचाच प्रश्न असता तर तेथील शास्त्रज्ञांना (Scientists) आज सरकारी क्षेत्रातील संचालकांपेक्षाही (Directors) जास्त पगार व सुखसोयी मिळतात. तरीदेखील डॉ. राजगोपालन, डॉ. गांगुली यांच्यासारखे हुशार लोक ह्या नोकऱ्या सोडून परत परदेशी का जातात? व्ही. एन्. कामतांनी स्वत: डॉ. गांगुलींच्या निरोप समारंभात भाषण केले होते. त्या प्रसंगी ते म्हणाले होते की, "डॉ. गांगुलींच्या हुशारीला अमेरिकेत वाव मिळेल अशी माझी खात्री आहे." जी परिस्थिती भारत-अमेरिकेसंबंधात तीच परिस्थिती आज 'रिसर्च सेंटर्स 'बद्दल आहे. विद्यापीठातून बाहेर पडणारे होतकरू तरुण काही तरी चांगले कार्य करावयास मिळेल ह्या आशेने 'रिसर्च सेंटर्स 'मध्ये दाखल होतात. पण तिथे लवकरच त्यांचा भ्रमनिरास होतो. मग त्यांच्यापुढे दोनच पर्याय राहतात. एक, त्यांच्या अनुभवाला (Experience) बाहेर किंमत नसल्यामुळे प्रसंगी कमी पगारावरही बाहेर पडणे, अथवा परदेशी जाणे. एकट्या "सिबा रिसर्च सेंटर"-मधून दोन वर्षांत ५० च्या वर परदेशी गेल्याचे कामत मान्य करतात; अर्थात कमी पगारावर अथवा तेवढ्याच पगारावर देशातच दुसऱ्या नोकऱ्या पत्करलेल्यांचा ह्यांत समावेश नाही. कामत म्हणतात, अशा लोकांत कवडेच फार. कवी थोडे. पण कवडे आहेत म्हणून कवींच्या कवित्वाचे कौतुक. सगळेच असामान्य असले तर असामान्यत्व राहणारच नाही. ते सर्वसामान्यच ठरतील. आणि फक्त असामान्यांनीच पुढे जावे असे म्हणणे असेल तर ते निवडावेत कसे ? डॉ. खोरानांना 'नोबेल पारितोषिक' मिळेपर्यंत तेही 'कवड्यां 'तच जमा होते. अजूनही मूठभर लोक सोडले तर त्यांनी काय मोठे कार्य केले हे इतरांना सांगता येईल की काय ह्याविषयी शंका वाटते. फक्त ज्या अर्थी "नोबेल" दिले गेले त्या अर्थी त्यांनी चांगले कार्य केले असले पाहिजे, असे लोक म्हणतील. श्री. दाभोळकरांनी एक तक्ता देऊन सुचविले आहे की, 'नोबेल' देण्यामागेही राजकारण आहे. मला एवढेच सांगावेसे वाटते की, श्री. दाभोळकरांनी प्रथम ह्या शास्त्रज्ञांनी काय कार्य केले व कोणत्या संशोधना-बद्दल त्यांना "नोबेल" दिले त्याचा अभ्यास करून नंतर हा तक्ता दिला तर बरे झाले असते. मी Biochemistry चा विद्यार्थी ह्या नात्याने डॉ. कून (Cohn), डॉ. वारबुर्ग ह्यांच्या कार्याबद्दल सांगू शकेन. रक्तामधील प्रथिनांचे (Proteins) डॉ. कून ह्यांनी पृथक्करण केले. हे कार्य खरोखरच प्रशंसनीय आहे. डॉ. वारबुर्ग-यानींही पेशी व इतर भाग (Cells & Tissues) ह्यांतून प्राणवायूचे प्रमाण शोधून

काढण्याच्या पद्धती व साहित्य (Apparatus) उपलब्ध करून दिले. सांगण्याचे तात्पर्य, की हे शास्त्रज्ञ "नोबेल"ला खरोखरच लायक होते. मोठ्या गुरूंचे शिष्य म्हणून त्यांना "नोबेल" दिलेले नाही. उलट, ह्या तक्त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, तेथील शास्त्रज्ञ आपली परंपरा चालवणारे शिष्य निर्माण करतात जे आपल्याकडे अभावानेच आढळेल.

श्री. कामतांनी चीनचे उदाहरण दिले आहे. परंतु प्रारंभी चिनी शास्त्रज्ञही परदेशांत जाऊन आलेच. आज त्यांनी आपले पारंपरिक चिनी वैद्यकशास्त्र पूर्ण विसरून जाऊन "पाश्चात्य औषधी ज्ञान" (Alopathic) मान्य केले आहे, जे आम्हीही करतो. आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचे Synthetic Drug (कृत्रिम पदार्थ) बनविण्यास आम्हीच मदत करतो. कारण अशा पदार्थांचे दीर्घकालीन दुष्परिणाम (Long term side effects) आमच्या रसायन शास्त्रज्ञांना माहीत नाहीत. त्यांचा अभ्यास करायला बायोकेमिस्टच पाहिजेत. पण डॉ. जोशींच्या मते आमच्या


बृन्हमुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.**, १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स**, १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

देशाला बायोकेमिस्टची गरज नाही. " त्यांची बुद्धी येथे गंजेल " (Brain Rust) असे ते म्हणतात. हा पंक्तिप्रपंच आज देशाला नडतो आहे. देशाला जेवढी रसायन शास्त्रज्ञांची जरुरी आहे तेवढीच इतर शास्त्रज्ञांचीही आहे; किंबहुना हे एक सांघिक कार्य (Team Work) असते. डॉ. जोशींनी जे "चंपाकिन" नावाचे औषधी द्रव्य शोधून काढले आहे ते बायोलॉजिस्ट व बायोकेमिस्टनी अभ्यासल्यानंतरच " औषधी " द्रव्य ठरणार आहे.

श्री. कामतांनी जे निबंध लिहिले आहेत त्यांमुळे खरोखरच मानवजातीचे कल्याण होणार आहे का ? का फक्त " शैक्षणिक दृष्ट्या "च (Academic Interest) ते महत्त्वाचे आहेत, ह्याचा त्यांनीच स्वतः विचार करावा. " निबंध लिहिणे " (Paper Publications) म्हणजेच हुशारीचे गमक (मग त्याची " पातळी " काहीही असो) असा एक गैरसमज आपल्याकडे आहे. आणि ते परदेशी नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्याचा " कैफ " आम्हांला चढला आहे.

श्री. कामत जर प्राचार्य झाले असते आणि संशोधनाची त्यांना नितांत हौस असती तर ते निश्चितच जास्त कार्य करू शकले असते. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा, स्वतःच्या कल्पनांचा त्यांना त्या ठिकाणी चांगला उपयोग करता आला असता. "चरक" किंवा इतर आयुर्वेदीय ग्रंथांतील मान्य औषधी झाडपाल्यांपासून नैसर्गिक पदार्थ (Natural Product) काढण्यात (ज्या ठिकाणी हुशारीची आवश्यकता लागत नाही) त्यांच्या हुशारीला काहीच वाव नाही.

श्री. कामत डॉ. नेरूरकरांचे उदाहरण देतात. पण डॉलर्स आणण्याकरिता त्यांना अमेरिकेतच जावे लागले अणि आजही आपल्या विद्यार्थ्यांना मदत मिळवून देण्यासाठी अमेरिकन विद्यापीठाचे सहकार्य घ्यावे लागते.

श्री. दाभोळकर म्हणतात, की डॉ. भाभाही अमेरिकेत राहिले असते तर "नोबेल" मिळाले असते, तरीही ते भारतात परत आले. श्री दाभोळकरांना कदाचित विस्मरण झाले असेल की, डॉ. भाभांनी "मेसॉन"वर जे कार्य केले, तेच डॉ. हिडेकी युकावा ह्या त्यांच्या समकालीन जपानी शास्त्रज्ञांनी केले व डॉ. युवकांचा प्रबंध आधी प्रसिद्ध झाल्यामुळे ते "नोबेल"चे मानकरी ठरले. भारतात परत आल्यावर मात्र त्यांना प्रशासकीय (Administrative) काम करावे लागल्यामुळे त्यांच्यातला "संशोधक" संपला. डॉ. भाभांनी सुरुवातीला भारतीय शास्त्रज्ञांना शिक्षण देण्यासाठी अणुशक्तिकेंद्राला संलग्न असे प्रशिक्षण विद्यालय स्थापले. (Training College) एवढेच नव्हे तर दरवर्षी काही तरुणांना परदेशी शिक्षण देऊन आणण्याची प्रथा चालू केली. आज पंधरा वर्षांनंतरही ही प्रथा चालू आहेच. वास्तविक अणुशक्ती मंडळाकडे बरेच "परदेशी प्रशिक्षित" शास्त्रज्ञ आहेत. नवीन लोकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य देशातही चांगल्या प्रकारे करता येणे शक्य आहे. असे असूनही अजूनही दरवर्षी नवीन "गट" परदेशी पाठवून आणण्यामागे काय

हेतू आहे ते समजत नाही. डॉ. भाभांनी घालून दिलेली प्रथा बंद करण्याची "हिम्मत" कोणी दाखवावी ? सरकारच त्यांना परदेशी पाठवून आणते तर मग स्वतंत्रपणे जे जातात त्यांना शिव्या का ?

हे सर्व लिहिण्यामागे कोणाला दुखवण्याचा किंवा कोणावर टीका करण्याचा मुळीच हेतू नाही. श्री. कामत व श्री. दाभोळकर यांना मी चांगलेच ओळखतो. त्यांच्याबरोबर मी कामही केले आहे. पण त्यांच्या मतप्रदर्शनामुळे शास्त्रीय क्षेत्रात काम न करणाऱ्यांचा गैरसमज होऊ नये म्हणून हा खटाटोप. मला एवढेच सांगायचे आहे की Live and let live, do and let others do (जगा आणि जगू द्या, स्वतः कार्य करा, लोकांनाही करू द्या) हे तत्त्व आपण अंगीकारले पाहिजे. भारतीय शास्त्रज्ञांना किंबहुना भारतीयांना कोठेही जाऊ द्या, कोठेही कार्य करू द्या. जर त्यांचे कार्य चांगले असेल तर "एक श्रेष्ठ भारतीय" म्हणून अभिमानाने गौरवूया. ह्या आरोपप्रत्यारोपाचा गदारोळ उडवून काहीच फायदा नाही.

शेवटी डॉ खोरानांचे वैयक्तिक यश द्यायचा मोह अनावर होतो आहे, अर्थात तरुणांना ते उद्बोधक ठरावे.

जन्म–९ जानेवारी १९२२ रोजी रायपूर येथे. पंजाब विद्यापीठातून १९४३ साली बी. एस्सी. व १९४५ साली एम्. एस्सी. लिव्हरपूल विद्यापीठातून "डॉक्टरेट" (Ph. D.) १९४८ मध्ये. १९४८-४९ "स्विस फेडरल इन्स्टिटयूट-' मध्ये प्रोफेसर व्ही. प्रेलोग ह्यांच्याबरोबर भारत सरकारचा "फेलो" म्हणून काम केले. १९५० ते १९५२ मध्ये केंब्रिज विद्यापीठात "नफिल्ड फेलो" म्हणून डॉ. ॲलेक्झांडर टॉड (नोबेल पारितोषिक १९५७) ह्यांच्याबरोबर काम केले. १९५२ ते १९५८ ही सहा वर्षे कोलंबिया विद्यापीठात प्राध्यापक व डिपार्टमेंटल प्रमुख म्हणून काम केले. १९६० मध्ये ते अमेरिकेतील मेडीसन येथील विसकॉन्सिन विद्यापीठात, एन्झाईम् संशोधन संस्थेत (Enzyme Research Institute) दाखल झाले. १९५८ मध्ये त्यांना केमिकल इन्स्टिटयूट कॅनडा ह्या संस्थेचे "मर्क ॲवॉर्ड" देण्यात आले. त्यानंतर १९६० मध्ये "प्रोफेशनल इन्स्टिटयूट ऑफ कॅनेडियन पब्लिक सर्व्हिसेस"चे सुवर्णपदक बहाल केले गेले. १९६७ मध्ये त्यांना "दानी हैनमेन प्राइझ" मिळाले. (Dannie Heinemann Prize, 1967) आणि ह्या सर्वांवर कळस म्हणून शास्त्रीय जगतातील अत्युच्च असे "नोबेल" पारितोषिक १९६८ मध्ये दिले गेले. भारताची मान उंचावली. सर्व भारतीय ह्याबद्दल त्यांचे ऋणी आहेत. डॉ. खोरानांनी पोली पेप्टाइड्स, को-एन्झाईम-ए, आर. एन्. ए. व डी. एन्. ए. (अनुक्रमे Polypeptides, Co-enzyme-A, R. N. A & DNA) ह्या विषयांसंबंधी मौलिक सिद्धांत मांडले आहेत.

O

सौ. विमल कर्वे

# लेकुरवाळी

कृष्णा पाटलाच्या नातवाने सकाळपासून 'आ' पसरला होता. घरात कोणाला काही सुचत नव्हते. चार महिन्यांचे तान्हे मूल, रडून रडून मुलाचा जीव कासावीस होत होता. त्याला रडण्याच्या यातना सहन होत नव्हत्या. इवल्याशा कोवळ्या ओठांभोवती निळसर वर्तुळ झाले होते. जीव कोंडून जात होता. पोट शेकणे, चोळणे वगैरे सगळे उपाय झाले, गावातील वैद्य येऊन गेले, पण नखभरही फरक नव्हता.

पाटलाची सून घाबरून गेली. तीही हमसून-हमसून रडू लागली. पहिलेच मूल, काडीचा अनुभव नव्हता. सासू-सासऱ्यांना बोलावणे पाठवायचे, म्हणजे तिला चोरट्यासारखे होत होते. कधी नव्हते ते लेकीकडे, शेजारच्या गावी दोन दिवस गेले होते. पण नाइलाज झाला. तातडीचा निरोप पाठवला गेला.

वंशाचा दिवा फडफडतो आहे, असे कळल्यावर आजोबा-आजी निरोप मिळाल्या पावली परतले. आल्या आल्या आजीने चुलीतली चिमटीभर राख घेतली, लेकुरवाळीचे नाव घेऊन, अंगारा म्हणून नातवाच्या कपाळाला लावला. अंगाऱ्याचा हात सगळ्या अंगावरून फिरविला. लेकुरवाळीच्या देवळात तेलवात घेऊन धाकट्या मुलाला पिटाळला.



'देवळात दिवा लावून ये,' म्हटल्यावर यशवंताच्या पोटात भीतीने गोळा उठला. करकरीत तिन्हीसांजा झालेल्या, तळ्याकाठी त्या वेळी चिडीचूप असे. कडेवर आपल्या तान्हुल्याला घेऊन उभी असलेली देवळातील लेकुरवाळीच जागृत होऊन, मूर्तीतून बाहेर आली, अन् तिने मला काल का विसरलात ? म्हणून खडसावलेन तर ! या शंकेनेच यशवंताला कापरे भरत होते. पण भीती बोलून दाखवायची सोय नव्हती. त्याचा पाय थोडा घटमळतो आहे, असे वाटल्याबरोबर, त्याची आई–पाटलीणबाई–गरजली "आता कापरं भरताय. मग काल आठवणीनं अवसेचा दिवा लावायला काय झालं होतं ? ती देवता काही करणार नाही. पळ लवकर."

ज्या सुवासिनीने सर्व स्वर्गीय देवतांची प्रार्थना करून त्यांचे मनोबल मागून घेतले, त्या सर्वशक्तिनिशी आपले मन घट्ट करून, जलदेवतेला आपल्या कुडीतील जीवनरस दिला. तीन महिन्यांच्या तान्हुल्याला मागे ठेवून, गावासाठी आत्मसमर्पण केले. गाव हसते-नांदते केले. ती आभाळाएवढ्या मोठ्या मनाची माऊली आपल्या घराकडे, कधीच डोळा वाकडा करून पाहणार नाही, अशी पाटलीणबाईची खात्री होती. त्या त्यागमयीला आपण विसरलो, कृतघ्न झालो की, परमेश्वरच आपल्यावर संकटे आणून आपल्याला भिवडवतो अशी त्यांचीच नव्हे, तर सबंध गावाची श्रद्धा होती.

लेकुरवाळीच्या देवळात दिवा लागून, थोडा वेळ होत आहे तोच, मुलाचे रडणे कमी झाले. आजीच्या मांडीवर, प्रेमाच्या उबेत ते लहान लेकरू विसावले. त्याच्या पापण्या मिटू लागल्या. सगळ्यांना हायसे झाले व देवीची साक्ष पटली.

नेहमीच असे होई. दुखणेबाणे आले की, लेकुरवाळीच्या नावाने अंगारा लावला, तिचे नाव घेतले, की दुखणे दूर पळे. गेली पन्नास वर्षे असे चालू होते. लेकुरवाळी म्हणजे जागृत देवता होती. सबंध गाव दर अमावास्येला देवळात देवीपुढे तेलवात लावी. संकट आले की देवीला साकडे घाली. संकटाने काढता पाय घेतला की, काळजीची शिळा काळजावरून बाजूला होई, आनंदीआनंद नांदू लागे. नातवंडे आजीच्याभोवती जमत, "आजी, लेकुरवाळीची गोष्ट परत सांग ना." म्हणून पाठीमागे लागत. त्यागाचा महिमा आजीच्या तोंडून स्रवू लागे. श्वास रोखून, कानांत प्राण आणून, भारावलेल्या मनाने मुले आजीच्याभोवती कोंडाळे करीत. तहानभूक विसरून गोष्ट ऐकत. प्रत्येक वेळी तीच कहाणी ऐकत, प्रत्येक पिढी मोठी होत होती. श्रद्धेने लेकुरवाळीपुढे दिवा लावीत होती.

बाहेरगावचा पै-पाहुणा आला, त्याने तळच्याकाठची कडेवर मूल घेतलेली, देवळातील देवीची मूर्ती पाहिली की, त्याचे कुतूहल जागृत होते. त्याला मोठ्या भक्तीने 'देवी'ची–पाटलाच्या घराण्यातील एका लेकुरवाळ्या सासुरवाशिणीची–कहाणी सांगितली जाते.

त्या वेळी गावात पन्नास-पाऊणशेच उंबरठा होता. गाव लहान होते. पाण्याच्या टंचाईमुळे वाढत नव्हते. उमलती नवी पिढी त्याच मातीत रुजत असे, पण कायमचा वास करायला दूरवर जाई. घराला चिकटून बसायला तयार नसे. प्रेमाच्या पाशात सापडून, आपल्याच हाताने संकट ओढून घ्यायला तयार नसे.

उन्हाळा सुरू झाला, तापी पडू लागल्या की, सगळ्यांना धसका बसे. माहीशिवरात्र उलटली की, विहिरी-तळी आटायला लागत. कोरड्या ठणठणीत पडत. जणू काही शिवरात्रीच्या रात्री शिवशंकर आपला तृतीय नेत्र उघडून गावात ठाण मांडत. त्यांच्या क्रोधाच्या भीतीने विहिरीतले सगळे झरे कोठे लुप्त होत, कोण जाणे! विहिरी खोदखोदून, कर्त्या पुरुषांचे हात ठणकत, आंबून जात. लोकांची कीव येऊन, काही दगडांना पाझर फुटायचा. नेहमी उसळी मारून, बाहेर येणारा झरा येऊ की नको? येऊ की नको? करीत, घुटमळत, थेंबाथेंबाने बाहेर यावयाचा. धरतीच्या पोटात किती खोलवर जावे, तेव्हा कोठे चुळकाभर पाणी लागायचे. पण हे भाग्यसुद्धा काही विहिरींनाच लाभायचे. त्या पुनीत व्हायच्या. त्यांना पृथ्वीमोलाची किंमत यावयाची.

एकेका विहिरीवर पाचपंचवीस लोकांची झुंबड उठे. सांजची लक्ष्मी घरात यावयाची वेळ झाली, चहूबाजूंनी अंधार दाटू लागला की लोक आपआपली भांडी

विहिरींच्या तळाशी नेऊन ठेवीत आणि घरी परतत. सूर्योदयाबरोबर अमृताने भर-लेले घडे घरोघर नेत.

पण काही वेळा दुःखाचा काळोख घेऊनच सूर्य उगवे. रात्रीच्या गुडुप अंधारात, काही लुच्चे बहाद्दर विहिरीत उतरून, सगळे पाणी एकत्र करून भांडे घरात नेऊन, रिकामे करीत. शाहजोगपणाने भांडे परत आणून ठेवीत. कोणाला तरी कुणकुण लागे, लबाडी लक्षात येई. गुपचूप जागता पहारा बसे. चोर पकडला जाई. भांडण जुंपे. डोकी फुटत. पाण्याच्या धारांऐवजी रक्ताच्या धारा उसळत. इकडे एवढ्या गडबडीत आधीच कोणी तरी विहिरीत उतरून आपला फायदा करून घेत. पण तापलेली डोकी शांत झाल्यावर सारे लक्षात येई.

दिवसभर गावावर दुःखकळा पसरे. तहानेने आधीच कोरडा पडलेला घसा, दुःखाने दाटून येई. तोंडात घालण्यासाठी घेतलेला घास हातातच राही. पाण्याच्याच घोटाबरोबर, दुःखाचा आवंढा गिळून, वयस्क लोक पान बाजूला सारीत, आणि असे व्हायला नको होते, म्हणून विचार करीत बसत.

एक वर्षी एक देवऋषी गावात आला. गावाचा होऊन गेला. त्याच्यावर सग-ळ्यांची श्रद्धा बसली. त्याने ध्यान-धारणा केली. देवाला कौल लावला. गावच्या पाटलाला सांगितले, गावच्या उत्तरेला एक लहानसे तळे आहे. ते खण. महामूर पाणी लागेल. माझे शब्द खोटे होणार नाहीत. खोटे झाले तर देवापुढे जीभ हसडून प्राण देईन.

तळे कसले! मोठे डबके होते ते. तेच सर्वाआधी कोरडे ठणठणीत पडे. त्यातील माया आटे. पण देवाने कौल दिला होता. देवऋषीने स्वतःच्या प्राणांची हमी दिली होती. म्हादबा पाटलांनी सगळ्या गावाला बोलाविले. उन्हाळ्याच्या आधीच सग-ळ्यांनी कंबर कसली. जो तो कुदळ-फावडे घेऊन, तळ्याकडे धावू लागला. गावाला उदंड पाणी मिळणार होते. गाव सुखी होणार होते. तपश्चर्या करून भगीरथाने एकट्याने गंगा पृथ्वीवर आणली. केसाएवढी पाण्याची धार प्रसन्न होऊ नये? एवढी पुण्याई गावाच्या पदरी नव्हती का?

खोदाई सुरू झाल्यापासून, त्यात खंड नव्हता. उगवत्या रश्मीबरोबर कामाला सुरुवात होई. आपली पाळी आली की, पहिल्यांना 'खो' देऊन, त्यांची जागा दुसरे घेत. नष्टचर्य संपणार होते. झपाट्यात तळ्याची खोली वाढत होती. तळ्या-काठी दगड–धोंड्यांचे ढीग रचले जात होते. कष्टाचे डोंगर उलटले जात होते. एकाच आशेवर, 'पाणी मिळणार.'

उन्हाळ्याचा ताप वाढू लागल्यावर, लोकांना कष्ट जास्त जाणवू लागत. ते घायकुतीला येत. त्यांचे प्राण कासावीस होत. कुडीतील जीव आकांत मांडत. एक-मेक एकमेकांच्याकडे केविलवाणे पाहत. क्षणभर थांबत. परत हात चालू होत. फाल्गुन सरला. पण पाण्याचा मागमूस नव्हता. तरी देवऋषी सांगतच होता,

'पाणी नक्की लागणार.' देवाच्या देवळात त्याची पूजा-अर्चा जोरात चालूच होती.

एक दिवस सगळे एकदमच जिवाच्या अटीतटीने कामाला लागले. तो दिवस शेवटचा होता. पाटलाने अन्नाचा कण घेतला नाही. आजचे व्रत कडक होते. दगडावर घणाघण घाव पडत होते. आणि काय आश्चर्य! संध्याकाळी पाण्याची धार वर उडाली. गंगा प्रकटली. पाणी थंडगार, मधुर होते. जलदेवतेला नमस्कार करून, सर्वांनी तीर्थ प्राशन केले. आत्मे शांत झाले. हर्षाने सर्वजण नाचू लागले. पाटलांनी तीर्थोदकाची पूजा केली. आनंदात सगळे लोक घरोघर परतले. दुसऱ्या दिवशी ताप नव्हता, घामाच्या धारा नव्हत्या, खणाखणी नव्हती. उजाडत पुरणपोळीचा नैवेद्य तळ्याकाठी जायचा होता. जलदेवता तृप्त होणार होती. परत येताना भरलेले अमृताचे घट घरी यावयाचे होते.

झुंजुमुंजू होत आहे, तोच सर्व गाव तळ्याकडे धावला, अन् काय दिसले? तळे कोरडे पाषाण. सर्वांचा आनंद मावळला. चेहरे दुःखाने काळवंडले. परत कुदळी-फावडी खणाणू लागल्या. आदल्या दिवशी पाण्याने दर्शन दिलेले होते, तेव्हा पाणी नक्कीच लागणार याची खात्री होती. आणि मावळतीला पाणी परत उसळून वर आले. आनंद दुथडी वाहू लागला. हायसे वाटून लोक घरी परतले.

पण दुसरा दिवस आदल्या दिवशीची निराशा घेऊनच प्रकटला. तळे कोरडे ठणठणीत होते. 'पाणी कोठे जाते?' सगळ्यांना कोडे पडले. जलदेवतेने हुलकावणी देण्याचा जीवघेणा खेळ मांडला होता. असे रोज चालू होते. संध्याकाळी पाण्याची धार पाहून, लोकांच्या तोंडाला आशेचे पाणी सुटे. दुसऱ्या दिवशी नव्या निश्चयाने कोरड्या तळ्यात घाव पडू लागत.

देवऋषी देवाच्या देवळात चोवीस तास बसून असे. पाटलाने आपल्या देवांना पाण्यात बुडवून ठेवले होते. त्यांचे देव जागृत होते. तो देवासमोर चार चार तास धरणे धरून बसे. आपल्या लाडक्या नातवाकडे लक्ष द्यायला, कौतुकाने त्याला खेळवायला, कशालाच त्याला सवड नव्हती. काही सुचत नव्हते. सुनेने जेवायला 'हाक' दिली की, तो पानावर बसे, चार घास पोटात घाली. काळजीने घेरले होते त्याला.

एक दिवस त्याला स्वप्न पडले, तळे पाण्याने पूर्ण भरले होते. त्यातून एक तेजःपुंज देवता वर येऊन त्याला खुणावू लागली. जवळ बोलावू लागली. तो जवळ गेला. देवता म्हणाली, "तान्हं मूल असलेली लेकुरवाळी सवाष्ण बळी दे. पाणी कधी आटायचं नाही. गाव सुखी समृद्ध होईल."

त्या भयंकर स्वप्नाने पाटील खडबडून जागा झाला. तान्हे मूल असलेली सवाष्ण बळी द्यायची! कोण तयार होईल, हे दिव्य करायला? त्याच्या डोळ्यांपुढे, तीन महिन्यांची बाळंतीण असलेली, त्याची सून आली. त्याचा जीव उडून गेला. त्याने झटकन मनातील विचार निपटून टाकला. त्याची झोप उडाली. कधी डोळ्याला

डोळा लागला की, स्वप्नाचा प्रभाव सुरू होई. देवी तळ्यातून वर येई. त्याला वजावू लागे–"बळी दे, गाव सुखी कर. मनात आणलंस, तर तूच हे करू शकशील." जरा वेळाने ते दृश्य नाहीसे होई. आगीचा डोंब उठलेले गाव दिसू लागे. त्याने झोपेचा धसकाच घतला. त्याची भूक–तहान नाहीशी झाली. त्याने खाणे–पिणे सोडलेन. तो उदासवाणा, आपल्याच विचारांत, कोठेतरी दृष्टी लावून, वेड्यासारखा बसून राही.

सून पाटलाची फारच लाडकी होती. बायकोच्या पाठीमागे वर्षाच्या लेकाला त्याने आई होऊन वाढविले होते. त्यात त्याला फार हाल काढावे लागले होते. पण घरात सून आल्यापासून, त्याची जबाबदारी, कष्ट संपले होते. तीच त्याचे सर्व प्रेमाने करी. हवे–नको पाही. सासऱ्याकडे तिचे बारीक लक्ष असे.

पाटील कसल्या तरी दुःखात चूर आहेत, हे तिने ओळखलेन. एक दिवस त्याला म्हणाली, "मामंजी ! एक विचारू का ? काय होतं आहे तुम्हांला ? तुम्ही खात-पीत नाही. कशात लक्ष नाही तुमचं. गेल्या चार दिवसांत बाळालासुद्धा हात नाही लावलात. किती दशा झाली आहे तुमची ! तळ्यातील पाणी मुताटकीसारखं, नाहीसं होतं, म्हणून जिवाला लावून घेतलं आहे तुम्ही. पण आपण काय करणार ?"

"काय सांगू तुला मुली ! तू लहान आहेस. खरंच नाही घेतलं चार दिवसांत बाळाला. आण त्याला इकडे, गुलाम जागा आहे ना !" सुनेचा प्रश्न टाळण्यासाठी पाटलांनी विषय बदलला.

"मग आणते त्याला. आधी काय दुःख दाटलं आहे, ते सांगा. मन हलकं होईल."

"आपल्या हातांत का आहे काही ! जलदेवतेला अवसेला बळी पाहिजे आहे." चाचरत महादवा पाटील म्हणाले.

"मग त्यात काय ! या अवसेला बकरा कापा की."

"नाही ग बाळ, इतकी सोपी गोष्ट नाही. देवीला माणसाचा बळी हवा आहे." पाटील झटकन बोलून गेले.

"माणसाचा !" भयंकर भीतीने छातीवर हात दाबत सून कापऱ्या आवाजांत म्हणाली. तिचा तिच्या कानांवर विश्वासच बसेना.

"होय, माणसाचा. तेसुद्धा तान्हं मूल असलेल्या सुवासिनीचा." पाटलांच्या तोंडून शब्द बाहेर पडले. त्यांनी धीर करून, स्वप्नाची हकीकत सुनेला सांगितली, आणि बाहेर पडणारे रडू आवरण्यासाठी, तोंडावर हात दाबून, मान खाली घातली.

"तान्हं मूल असलेल्या, लेकुरवाळ्या सवाष्णीचा बळी ! ही काळजी खाते आहे तुम्हांला ! काळजी करू नका. सगळी सोय होईल." निश्चयी स्वरांत सून म्हणाली.

"काय ! तू ! काय करायचे ठरविले आहेस ?" पाटील दु:खाने गलबलून म्हणाले.

"होय, मी देवीला माझं शिरकमल वाहणार आहे. तिला शांत करून, गावाला जीवन देणार आहे. आपल्या कुळाचं कर्तव्य आहे ते. धर्म आहे तो. आपल्या घराण्याच्या नावाची पताका उंच फडफडत ठेवणार आहे मी. तुमची काळजी दूर करणार आहे. नाहीतर देवी कोपेल, सगळ्यांचं वाटोळं होईल. पण मला आधी एक वचन द्या."

"काय वचन पाहिजे तुला ? तुझ्या लेकराचा नीट सांभाळ करायचा ना ? तुझी सामू वर्षाच्या मुलाला टाकून देवाघरी गेली. ती आजारी तरी होती. तू-तू चालती-बोलती मृत्यूला मिठी मारीत आहेस. काय माझा विचित्र योग आहे." पाटील दीर्घ उसासा टाकीत म्हणाले.

"नातवाचा सांभाळ तर तुम्ही करालच. पण दुसरीच महत्त्वाची मागणी आहे. परवा अवस. देवीला नैवेद्य लवकर दाखविला पाहिजे. नाही तर ती कोपेल. सगळ्यांचा नाश होईल. तेव्हा मी घालीन ती अट मान्य आहे, असा मला आधी शब्द द्या. नाही म्हणू नका."

"माझ्यावर देवाचा कोप झालेला दिसतो. काय त्याच्या मनात आहे समजत नाही. बरं, मान्य आहे मला, तू घालशील ती अट." आलेले अश्रू लपवीत पाटील म्हणाले.

"पुढच्या अवसेपर्यंत, रोज रात्री बारा वाजता, बाळाला तळ्याकाठी आणायचे. भिऊ नका. नाही म्हणू नका. मातृप्रेमाचा पाझर एकदम आटणार नाही हो. बाळाला घेतल्याशिवाय माझ्या आत्म्याला शांतता मिळणार नाही. मात्र हे सर्व कोणाजवळ बोलू नका. ही शेवटची भिक्षा घालाच मला."

ही चमत्कारिक मागणी ऐकून, पाटलाने वर मान करून सुनेकडे पाहिले. अगम्य अशा निश्चयाने तिचा चेहरा फुललेला होता. तिची नजर दुसऱ्याच जगाकडे लागली होती. ही आता मागे वळणार नाही, अशी त्याची खात्री झाली. त्याने शब्द दिला.

दोन दिवस पाटलाचे लक्ष सुनेकडे सारखे होते. तो अशुभ दिवस उगवला. सून मुकेपणाने घरात वावरत होती. शांतपणे तिचे सर्व काम चालू होते. रात्रीचा पहिला प्रहर उलटला, दुसरा संपत आला. पाटलाला वाटले, सुनेचे मन पालटले. बरे झाले. घरावरचे अरिष्ट टळले. त्याचा पहाटेला डोळा लागला.

सुनेने चाहूल घेतली. सगळीकडे नीरव शांतता पसरली होती. तिने आपल्या तान्हुल्याला मांडीवर घेतले. त्याच्या अंगावर मायेचा हात फिरत होता. डोळ्यांना धारा लागल्या होत्या. आपल्या लेकराचे पोट भरल्यावर, तिने त्याला अलगद खाली ठेवले. मोठ्या प्रयासाने गळ्यात दाटून आलेला हुंदका परतवला. आपल्या काळजाचा तुकडा डोळे भरून पाहून घेतला आणि पाठ फिरविली. घरातील देवाला

नमस्कार करून, त्या सर्वशक्तिमान परमेश्वराजवळ तिने मनोबल मागून घेतले. हळूच दिंडीदरवाजा उघडून ती तळ्याकडे चालू लागली.

मोठ्याच कसोटीला तिला उतरायचे होते. गौतमबुद्धाच्या त्यागावर मात करणारा त्याग करायला ती निघाली होती. उजाडता उजाडता मुलाच्या रडण्याने घर जागे झाले. अशुभ शंकेने पाटील लटलट कापू लागले. धडपडत सुनेच्या खोलीकडे धावले. बाज रिकामी होती. आक्रोश करीत ते तळ्याकडे धावत सुटले. कोणालाच काही कळेना, सर्व गाव त्यांच्या पाठीमागे धावत सुटले.

जादूची कांडी फिरवली होती. अद्‌भुत घडले होते. रोज भल्या मोठ्या रिकाम्या द्रोणासारखे 'आ' वासून, बसणारे तळे, आज पाण्याने काठोकाठ भरले होते. पाटलांची सून काठावर पडली होती. तिच्या मानेच्या शिरेतून, तांबड्या भडक रक्ताचा ओघ पाण्यात मिसळत होता. प्राणाला प्राण मिळत होता.

पाटलाच्या मुलाने बायकोचे कलेवर पाहून एकच आकांत मांडला. पाटलाच्या तोंडून सर्व हकीकत कळल्यावर, सगळे लोक त्या सुवासिनीच्या त्यागाने स्तिमित झाले. दुःखाने कासावीस झाले. पण पाटलाला दुःख करायला सवडच नव्हती. रात्रीच्या कामगिरीची आठवण होऊन, त्याचा जीव उडून जात होता.

तो संध्याकाळपासून बाराच्या ठोक्याची वाट पाहू लागला. एकदाचे बारा वाजले. त्याने हळूच नातवाला दुपट्यात गुंडाळले. आणि गुपचूप तळ्याकडे गेला. सुनेचे शब्द खरे असतील का ? ती दिसलीच तर तिच्या हवाली नातवाला करावे की नाही, त्याला अपाय तर होणार नाही ? नाना तऱ्हेच्या शंकांनी त्याचे मन शहारत होते. जड झाले होते. सून एका दगडावर बसलेलीच होती. तिचे डोळे त्याच्याच वाटेकडे लागले होते. त्याचे पाय भीतीने लटपटू लागले. जिवाचा थर-



काप झाला. त्याला शब्द ऐकू आले, " मामंजी ! भिऊ नका. द्या माझ्या जवळ त्याला. मायेच्या वारा मला आवरवत नाहीत. "

पाटलाने मुलाला खाली ठेवले. सुनेने उचलल्यावर तो थोडा दूर जाऊन बसला. काही वेळाने मलाचे रडणे ऐकून, त्याने वळून पाहिले. मूल एकटेच होते. मुलाला घेऊन तो घरी परतला.

कोणाजवळ काही बोलायची सोय नव्हती. त्याला शब्द पाळायचा होता. रोज रात्री बाराच्या सुमाराला पाटील मुलाला घेऊन जात. त्याच्या आईच्या स्वाधीन करीत. मुलाची भूक भागली की त्याला परत नेत. एक महिन्याचे व्रत होते. आता आठ दिवसांत दिव्य संपणार होते.

पण तिसरेच अघटित घडले. एक दिवस मुलाला ताप आला, पोट फुगले. आणि श्वास लागून, मुलाचा प्राण निघून गेला. पाटलाच्या पोटात भीतीने खड्डा पडला. थोड्या वेळात बारा वाजतील, तेव्हा काय करू ? काय सांगू सुनेला ? तिने गावासाठी प्राण दिलान. मला मात्र तिच्या लेकराचा सांभाळही करता आला नाही. कसे तोंड दाखवू तिला. प्रश्न पडला पाटलांना.

सून गेल्यापासून, नातू त्यांच्याजवळच असे. मुलाचे प्राण गेल्याचे कोणाला माहीत नव्हते. त्यांनी मनाशी काहीतरी निश्चय केला. ठरलेल्या वेळेच्या आधीच तळ्यात नातवासह अंग झोकून द्यायचे त्यांनी ठरविले. तो निर्जीव देह छातीशी कवटाळून, ते तळ्याकडे गेले. उडी टाकणार तोच शब्द ऐकू आले,

" मामंजी थांबा. द्या माझ्याजवळ त्याला. "


पाटलांनी थरथरत्या हातांनी तो निर्माल्य देह खाली ठेवला. मान गुडघ्यात घालून, ते तेथेच बसले. त्यांच्या देहातील सगळी शक्तीच नाहीशी झाली होती.

सुनेने नेहमीप्रमाणे अलगद हाताने मुलाला उचलले, पदराखाली घेतले. ते हृदयाला पीळ पाडणारे, करुण दृश्य पाहत, पाटलाने मान फिरविली. पण जरा वेळात चमत्कार घडला. त्यांचा त्यांच्या कानांवर विश्वास बसेनासा झाला. चुरू चुरू दूध पिण्याचा, भराभर घोट गिळण्याचा आवाज पदराखालून येत होता. सुनेचा प्रेमाचा हात मुलाच्या अंगावरून फिरत होता.

ही देवकरणी पाहून पाटील हर्षातिशयाने भारून गेले. लेकुरवाळीच्या पुण्याईने त्यांचा नातू त्यांना परत मिळाला होता.

नेहमीप्रमाणे सुनेने एकदा बाळाला छातीशी कवटाळून, हळूच खाली ठेवले, आपण बाजूला झाली.

घाईघाईने पाटील आनंदात पुढे झाले, त्यांनी नातवाला उचलले, आणि चमकून वर पाहिले. कोणीच नव्हते तेथे. जड थंडगार गोळा घेऊन, पाटील घरी गेले. गावाने लवकरच तुडुंब भरलेल्या तळ्याच्या काठी लेकुरवाळीचे देऊळ बांधले. त्या त्यागमय मूर्तीपुढे पाटलांकडून अमावास्येला नियमान दिवा लागत होता. O



# कल्याण
# जुने — नवे

कु. अलकनंदा साठे

ही आहे एका गावाची कहाणी. एकीचा, स्वावलंबनाचा उपयोग करून, खूप सुधारणा करून घेतलेल्या गावाची. ह्या गावच्या मागे उभे आहेत हुशार विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या ज्ञानप्रबोधिनी ह्या संस्थेचे संचालक डॉ. व्ही. व्ही पेंडसे आणि त्यांचा एक विद्यार्थी श्री. राम डिंबळे.

प्रत्येक गोष्टीसाठी सरकारवरच का म्हणून अवलंबून राहायचे ? स्वत:चे स्वत: काम करायला शिकले पाहिजे, तरच सुधारणा होऊ शकेल, ही श्री. पेंडसे यांची भावना. ग्रामीण विकास झाला पाहिजे, खेड्यात अतिशय दारिद्र्य

आहे, अज्ञान आहे, ते दूर झाले पाहिजे, ही तळमळ. योगायोगाने कल्याण गावाशी संबंध आला, तिथल्या लोकांशी ओळखी झाल्या आणि त्या गावच्या लोकांनी संबंध पुढे चालू ठेवले. ओळख झाली, विसरली असे नेहमी घडणारे तिथे घडले नाही. आपल्या अडचणी, आपल्या इच्छा वगैरे सर्व गोष्टी डॉ. पेंडसे यांच्याजवळ बोलल्या गेल्या. त्यांनी त्या समजून घेतल्या आणि सुधारणा करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकायचे ठरवले.

कल्याण हे गाव सिंहगडच्या पायथ्याशी आहे. गावची वस्ती आहे २०००. गाव म्हणजे भांडणे आलीच. पण त्या भांडणांवर मात केली सुधारणेच्या इच्छेने, जिद्दीने आपल्या सुधारणेसाठी, फायद्यासाठी भांडणे विसरून एकी करायला पाहिजे हे खूप जणांना समजत नाही. पण कल्याणवासीयांना समजले. अजूनही भांडणे आहेत, पण पूर्वीपेक्षा कमी.

ज्ञानप्रबोधिनीमध्ये राम डिंबळे हा विद्यार्थी आला हा योगायोग. तसेच डॉ. पेंडसे कल्याण गावात पुस्तक लिहिण्यासाठी जाऊन राहिले होते. तेव्हा त्यांच्या गावातल्या लोकांशी ओळखी झालेल्या होत्या. डॉ. पेंडसे पुण्याला परत आले तरी कल्याणचे रहिवासी नाना डिंबळे वगैरे त्यांना पुण्यात येऊन भेटत असत. त्यांना नाना तऱ्हेचे प्रश्न विचारीत, आपल्या अडचणी सांगत. त्यामुळे त्या खेड्यात काय सुधारणा करणे आवश्यक आहे ते डॉ. पेंडशांना सहजच समजत असे. ते स्वतः तिथे गेल्यावरसुद्धा त्यांना तिथे विहिरी खोदायला पाहिजेत, शेतीव्यवसाय सुधारण्यासाठी धरण बांधले पाहिजे, मुलांसाठी शाळा बांधली पाहिजे वगैरे अनेक गोष्टी दिसत होत्या.

प्रत्यक्ष कार्यक्रमाची योजना कशी केली असे विचारले असता डॉ. पेंडसे म्हणाले की, गावकऱ्यांना आपली मुले अज्ञानी राहतात याचे वैषम्य वाटू लागले. एखाद्या गोष्टीची खूप इच्छा असली की मार्ग शोधून काढावासा वाटतोच, प्रयत्न केला जातोच. गावात शाळा नसल्यामुळे बहुसंख्य मुलांना इच्छा असून शिकता येत नव्हते. शाळा नसल्यामुळे ज्ञानाची दारे बंद होती. ती दारे उघडण्यासाठी प्रथम शाळा बांधली गेली. गावकऱ्यांनी पट्टी बसवून पैसा गोळा केला श्रमदान करून जुन्या पद्धतीची चार खोल्यांची एक शाळा बांधून तयार झाली. गावची मुले स्वतःच्या श्रमांनी बांधलेल्या शाळेत जाऊन शिकू लागली. त्यांना शिकण्यात गोडी वाटू लागली.

मग हळूहळू विकासाची नवीनवी क्षितिजे दिसू लागली. गाव नदीच्या दोन बाजूंना वसलेले. गावच्या दोन भागांना जोडणारा पूल मग हवासा वाटू लागला. त्या दृष्टीने खटपट सुरू झाली. सरपंच श्रीहरी डिंबळे आणि इतर गावकरी यांनी आपले तनमनधन तिकडे गुंतविले आणि शिवनंदा नदीवरचा हा ३० फूट लांबीचा पूल श्रमदानाने दहा दिवसांत बांधून तयार झाला. गावकऱ्यांच्या पाठीमागे ज्ञानप्रबोधिनी होतीच.

गावातील बहुसंख्य लोक शेतकरी आहेत. शेतीवर हे सर्व लोक अवलंबून, पण शेती जुन्या तऱ्हेने चाललेली. पावसावर सर्व गोष्टी अवलंबून असून पाऊस चांगला पडला तर शेती चांगली पिकते. तरीही दोन पिके घेता येत नसत. मग पाणीपुरवठ्याची काही चांगली सोय करता आली तर सगळ्यांचाच फायदा होईल, असे वाटू लागले. शिवनंदा नदीवर छोटासा बंधारा घातला तर पाणीपुरवठ्याची चांगली सोय होऊ शकेल असे अनेक तज्ज्ञांनी सांगितले.

पण पैसे ? धरणासाठी पैसे कोठून उभे करायचे हाच तर सर्वांत मोठा प्रश्न होता. स्थानिक लोकांकडून–म्हणजे शहरातल्या वगैरे लोकांकडून–मदत मिळवण्यासाठी खूप खटाटोप करावा लागला असता. त्यात वेळही खूप गेला असता. मग काय ही योजना तशीच सोडून द्यायची ? पण तसे होणार नव्हते.

गेल्या वर्षी पुण्यात काही फ्रेंच विद्यार्थी आले होते. त्यांना भारतीय जीवन अगदी जवळून पाहायचे होते, फक्त शहरातलेच नाही तर खेड्यांतलेसुद्धा. त्या विद्यार्थ्यांनी डॉ. पेंडसे यांची भेट घेतली. डॉ. पेंडसे त्यांना कल्याणला घेऊन गेले. पावसाळ्याचे दिवस होते. गावाला जाण्यासाठी चांगला रस्ता नव्हता. चिखल, दगड वगैरे भरपूर असलेल्या रस्त्यावरून हे विद्यार्थी जिद्दीने कल्याणला जाऊन पोचले. त्यांना तिथे असलेली एकजूट, काम करून स्वतःचा विकास स्वतः करून घेण्याची आत्यंतिक इच्छा पाहून बरे वाटले. पण पुढचे काम पैशासाठी अडले होते. ते पाहून त्यांनी काही पैसे मदत म्हणून पाठवायचे ठरवले.

विद्यार्थी फ्रान्सला परत गेले. ते सर्व "The French Committee for Univesal Campagin against Hunger" ह्या फ्रान्समधल्या संस्थेचे सभासद होते. त्या लोकांनी सुमारे पावणे दोन लाखांची मदत दिली.

पैसे मिळाल्यावर मग धरण बांधण्याच्या कल्पनेला जोरात चालना मिळाली. हा बंधारा बांधल्यावर त्यात किती पाणी मावेल, किती एकर जमिनीला ह्याचा उपयोग होऊ शकेल, किती खर्च येईल, वगैरे गोष्टींबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला. पानशेत धरणाचे इंजिनीयर श्री. भालेराव, माजी चीफ इंजिनीयर श्री. चाफेकर, डॉ. गद्रे इत्यादी लोकांनी आपला बहुमोल सल्ला देऊन खूप मदत केली धरणाचा प्लॅन तज्ज्ञ इंजिनीयरांकडून तयार करवून घेण्यात आला.

गावकऱ्यांचा उत्साह इतका अमाप, इच्छा इतकी तीव्र की ते २३ फूट उंचीचे व ७–७।। फूट रुंद भिंतीचे धरण अवघ्या २७ दिवसांत तयार झाले. गावकऱ्यांनी धरण बांधण्यासाठी श्रमदान केले. धरणाला ४५,००० रु. खर्च आला, आणि गावकऱ्यांनी श्रमदानाने २२,५०० रु. दिले. बाहेरची कुठलीही माणसे मदतीला नव्हती. ज्ञानप्रबोधिनी तर गावचीच आहे. धरण मे महिन्यात बांधले गेले. त्या वेळेस शेतकऱ्यांना कामे नसतात असे नाही. पण नांगरट वगैरे कामे बाजूला ठेवून ह्या लोकांनी धरण बांधले. धरणामुळे ३०० एकर जमिनीला पाणी मिळणार आहे.

गावाला जाण्यासाठी रस्ता नव्हता. पावसाळयात तर कल्याणचे जवळजवळ सर्व जगाशी दळणवळण तुटायचेच. एवढया विकासाच्या योजना जिद्दीने पार पाडल्या. आता गावाला रस्ता हवाच. त्याशिवाय आपला विकास पूर्ण होणे शक्यच नाही, अशी भावना वाढीस लागली. रस्त्याची योजना तयार झाली. नंतर ज्ञान-प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान करून १० दिवसांत १ मैल लांबीचा रस्ता तयार केला.

गावात सध्या दोन कुक्कुटपालन केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रात ९० व्हाईट लेग हॉर्न जातीच्या कोंबडया आहेत. हा प्रयोग यशस्वी झाला तर अशी दहा कुक्कुट-पालन केंद्रे तयार करण्यात येणार आहेत. आणि प्रत्येकात १००० कोंबडया असतील. हा शेतकऱ्यांना चांगला जोडधंदा होऊ शकेल.

ह्या कार्यक्रमानंतर खेडेगावात काही परिवर्तन झाल्याचे आपल्याला आढळले काय, असे विचारले असता डॉ. पेंडसे म्हणाले की, आता गावकऱ्यांमध्ये खूपच आत्मविश्वास वाढला आहे. काम केले तर फायदा होतो याची जाणीव झाल्यामुळे कामाची उभारी वाढली आहे. क्षितिजे उंचावली आहेत.

स्वाभिमान हा प्रत्येक माणसाला, गावाला असला पाहिज. तसाच तो कल्याणच्या रहिवाशांना आहे. त्यांनी आपल्या सुधारणेसाठी फ्रेंच लोकांकडून पैसे घेतले आहेत. पण त्या कर्जाची त्यांना सतत जाणीव आहे. ते कर्ज फेडण्याची इच्छा आहे. ते कर्ज फेडल्याशिवाय खरी सुधारणा झाली असे मानायला ते तयार नाहीत. फ्रेंच लोकांना तो पैसा नको आहे; म्हणून जेवढा पैसा त्यांनी फ्रेंच लोकांकडून मिळवला तेवढा पैसा ते इतर खेडेगावांना विकासासाठी मदत म्हणून देणार आहेत. ते कर्ज फिटेपर्यंत धरणाची, रस्त्याची मोठया माणसाकडून उद्घाटने करायची नाहीत, असे त्यांनी ठरवले आहे.

तुमच्यापुढे काही योजना आहेत का, असे विचारले असता डॉ. पेंडसे यांनी सांगितले की, अनेक योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी गावाचे प्रयत्न चालू आहेत. प्राथमिक शाळेची पूर्वी बांधलेली इमारत जुन्या पद्धतीची आहे. खोल्यांना खिडक्या नाहीत. ती इमारत सुधारली जाणार आहे. शाळेत बाके आणायची आहेत. शाळा सातवीपर्यंत वाढवायची आहे. गावाला अनेक विहिरींची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे ५ विहिरी खोदण्यात येणार आहेत.

कल्याण गावाजवळ असलेल्या शिवापूर गावी एक वर्कशॉप काढण्यात येणार आहे. ती योजना दीड लाखाची आहे त्यामध्ये कुलुपे तयार करण्यात येतील. भूमिहीन मजुरांना त्यात रोजगार मिळेल. शिवाय तिथे मजुरांना शिक-वण्याची सोय करण्यात येणार आहे. ह्या भागातील अनेक लोकांचा ह्या योजनेमुळे फायदा होईल वर्कशॉपसाठी किर्लोस्कर, कूपर इंजिनीयरींग, टेल्को वगैरेंनी एक लाख रु. ची यंत्रसामग्री दिली आहे. कल्याणच्या धरणाला कालवा काढणे ही पणा

एक योजना आहे. नदीच्या किनाऱ्यावर नारळाची, काजूची लागवड करण्यात येणार आहे.

सरकारी कार्यक्रमांशी तुमच्या कार्याची सांगड तुम्ही कशी काय घातली असे विचारले असता डॉ. पेंडसे म्हणाले की, सरकारचे ह्या कार्याला पूर्ण अनुमोदन होते. विरोध असण्याचे काही कारणच नव्हते. त्यामुळे त्रास असा कधीच झाला नाही.


ह्या कार्याचा इतर आजूबाजूच्या खेड्यांत प्रसार व्हावा म्हणून आपली काही योजना आहे का, संघटना आहे का, असे विचारले असता ते म्हणाले की, संघटना अशी नाही; पण शिवगंगा नदीच्या खोऱ्यातील दहा खेड्यांना ह्या योजनेचा फायदा व्हावा. अशी इच्छा आहे. त्या लोकांनीही एकजूट करून स्वावलंबनाचा फायदा विकासासाठी करून घेतला पाहिजे.

ह्या कामासाठी तुम्ही ग्रामीण नेतृत्व उभे करू शकलात काय, असे विचारले असता ते म्हणाले की, तिथल्या लोकांनी सगळे काम स्वतःच्या हिंमतीवर केले. आम्ही मदत केली पण खरा पुढाकार त्यांचा. पण ज्ञानप्रबोधिनीही त्या गावाची झाली आहे. त्या लोकांना प्रबोधिनीबद्दल आपलेपणा वाटतो. ते प्रबोधिनीच्या लोकांचे स्वागत करतात. ह्या सर्व कामांत सरपंच श्रीहरी डिंबळे, सोसायटीचे अध्यक्ष श्रीकृष्ण डिंबळे, एकनाथ डिंबळे, भाऊ गेनू डिंबळे, भागवत, किरवे, कोंडिबा चव्हाण वगैरे लोकांनी पुढाकार घेतला.

खरोखर सर्वच खेड्यांनी आपला असा विकास करून घेतला तर....

○





**ब्रिगेडियर जॉन परशराम दळवी**

जन्म : ३ जुलै १९२०, वसरा (इराक)

सैन्यात प्रवेश : १९४०. दुसऱ्या महायुद्धात पूर्वेकडील आघाडीवर जपानी सैन्याच्या पाठलागात विशेष कामगिरी बजावली.

ऑक्टोबर १९६० मध्ये लडाख-जम्मू आघाडीवर विशेष नेमणूक झाली. आपल्या संरक्षण व्यवस्थेच्या विदारक स्थितीचा पहिला अनुभव दळवी यांना या कामगिरीवर असतानाच आला.

जानेवारी १९६२ मध्ये सातव्या पायदळ तुकडीचे प्रमुख म्हणून नेफा आघाडीवर दळवी दाखल झाले. ही सर्व तुकडीच २० ऑक्टोबरला चिनी सैन्याच्या भक्ष्यस्थानी पडली. 'आपले बेफिकीर धोरण, दुसरे काय ? तबकातून खाद्यपदार्थ पुढे करावेत तितक्या सहजपणे ही तुकडी आक्रमकांना 'भेट' म्हणून देण्यात आली,' अशी या भयंकर संहाराबाबतची दळवी यांची दुःखद भावना आहे.

युद्धकैदी म्हणून सात महिने दळवी चिनी तुरुंग-वासात होते.

भारत-चीन युद्धाशी इतका निकटचा व प्रत्यक्ष संबंध असलेले ब्रिगेडियर दळवी हे एकमेव वरिष्ठ सैन्याधिकारी आहेत.

म्हणूनच त्यांच्या लिखाणाला एक वेगळे वजन आहे, अनुभवाचे भरपूर पाठबळ त्यांच्यामागे उभे आहे.

**'Himalayan Blunder'** हे त्यांचे मूळ इंग्रजी पुस्तक लवकरच (Thacker and Co. Ltd.) मार्फत प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाचा हा मराठी अनुवाद. स्वैर नाही, अगदी शब्दशःही नाही, पण मूळ अर्थाला बाधा न आणणारा.


म्हणूनच अनुवादक अॅडव्होकेट माधव कानिटकर यांनी 'निवेदन' हा शब्द यासाठी योजलेला आहे.

चिनी स्वारीचा प्रकार पाहता 'झुंड' हे नाव या अनुवादाला योग्य वाटले. **— संपादक**

।। लेखक : ब्रिगेडियर जे. पी. दळवी ।।

अनुवादक : ॲडव्होकेट माधव कानिटकर

## १



२१ नोव्हेंबर १९६२ ची रात्र. थंडी मी म्हणत होती. आजूबाजूला भयाण वाटत होते. मला झोप लागत नव्हती. मी नुकताच डोळे मिटून पडलो होतो. गेले जवळ जवळ ७ महिने तिबेटमधल्या चिन्यांच्या तुरुंगात मी युद्धकैदी म्हणून एकांतवासात बंदिस्त होतो. रात्रीचे किती वाजले होते कुणास ठाऊक! अचानक माझ्या कोठडीचा लोखंडी दरवाजा खडखडला. माझ्या मनात विचार आला, 'आता पुढं काय वाढून ठेवलंय कुणास ठाऊक?' किती झालं तरी युद्धकैदी मी!



कुणीही केव्हाही उठवावं, काहीही उलटसुलट विचारावं, जबरदस्तीनं आपल्या देशाची गुपितं काढून घेण्याचा प्रयत्न करावा, जरूर वाटल्यास अमानुष मारहाण करावी. मी कैदी असलो तरी शत्रू होतो ना चिन्यांचा! अंधारातच खडबडून जागा होत मी विचारले, "काय आहे?" आणि अंधारातच माझ्या कोठडीच्या बाहेर उभा असलेला एक चिनी मेजर मला म्हणाला, "गुड न्युज! गुड न्यू ऽ ज! चीन आणि भारत यांच्यांतील युद्ध संपलं ही आनंदाची बातमी तुम्हांला कळवण्यासाठी आलो! चिनी सरकारनं असा निर्णय घेतला आहे की, विद्युत्‌वेगानं स्वारी करून भारताची जी जी जमीन आपण हां हां म्हणता जिंकून घेतली होती त्या त्या प्रत्येक ठिकाणाहून मागं जायचं. सैन्य काढून घ्यायचं!"

माझी उत्सुकता शिगेला पोचली. मी अधीरपणाने विचारले, "पण का? असं अचानक काय कारण घडलं?"

...आणि त्या चिनी मेजरने त्याला 'पेकिंग'ने पढवून ठेवलेले ठराविक उत्तर दिले, "भारत आणि चीन यांच्यांतील मैत्री हजारो वर्षांची आहे. हिंदी–चिनी भाई भाई! आपल्यामध्ये आत्तापर्यंत कधीच युद्ध झालं नव्हतं. चीनला युद्ध नको होतं. तुमच्या विकृत मनोवृत्तीच्या भारत सरकारनं चीनवर आक्रमण केलं होतं. आणि अशा स्थितीत केवळ नाइलाज म्हणून स्वतःच्या संरक्षणासाठी चीनला

मुक्तिसेना पाठवावीच लागली. लडाख आणि नेफामधल्या आमच्या भू-भागांचं आम्ही फक्त संरक्षण केलं ! जगाला चीननं हे दाखवून दिलं की, भारत सरकार जर का युद्धाच्याच मार्गानं सरहद्दीचा प्रश्न सोडवू पाहत असेल तर बलाढ्य चीन-पुढं भारताचं सैन्य म्हणजे 'किस झाडकी पत्ती आहे.' आता आम्ही परत जात आहोत. कारण आम्हांला युद्ध नको होतं आणि नको आहे. भारत आणि चीन यांच्यांतला सीमाप्रश्न आम्हांला शस्त्रबळावर सोडवायचा नाही. तो प्रश्न आम्ही भारताबरोबर शांततापूर्ण वाटाघाटी करूनच सोडवू. तीच आमची खरी इच्छा आहे."

जाता जाता तो चिनी मेजर तुच्छतेने माझ्याकडे पाहत म्हणाला की, "निदान एवढी जगभर नाचक्की झाल्यावर आतातरी तुमच्या भारत सरकारला काहीतरी अक्कल येईल आणि पश्चिमेकडच्या राष्ट्रांची उचललेली साम्राज्यवादी विचार-सरणी सोडून देऊन चीन आणि भारत यांच्यांतला सीमातंटा, निदान स्वतःचं भलं व्हावं म्हणून तरी भारत सरकार चीनबरोबर तावडतोब वाटाघाटी सुरू करूनच सोडवील, अशी आम्हांला आशा आहे !"

युद्धकैदी म्हणून मी एकूण ७ महिने चिन्यांच्या तुरुंगात होतो; पण ज्या क्षणी त्या चिनी मेजरने मला हे बालिश प्रवचन ऐकवले, मला आणि माझ्या देशाला कमीपणा दिला, तो अपमानास्पद क्षण मी या जन्मात विसरणे शक्य नाही. माझे रक्त सळसळले. संतापाने मी थरथरू लागलो. दुसऱ्याच क्षणी माझ्या लक्षात आले की, मी कैदी आहे ! एकटाच आहे ! निदान या क्षणी तरी मला हा असह्य अपमान सहन करण्यापलीकडे दुसरे काहीही करता येत नाही. तुरुंगाच्या लोखंडी दरवाजाचे गज दोन्ही हातांत घट्ट धरून मी दरवाजावरच डोके टेकले आणि त्या रात्रीच्या एकांतात असहाय्य मनाने ढळढळा रडलो. मला माझी लाज वाटली. माझ्या देशाची लाज वाटली. वाटले, उगाच जन्माला आलो मी भारतात, की जिथे जन्म घेण्यासाठी अनेक जन्मांची पुण्याई लागते अशी आजच्या या अपमानास्पद क्षणाचा अनुभव घेईपर्यंत माझी समजूत होती. माझ्या कोठडीचा दरवाजा दोन्ही हातांनी गदगदा हलवून मी तिथेच शपथ घेतली, की एक दिवस सगळ्या जगाला सत्य ओरडून सांगेन की, 'नाही ! नाही ! तुम्ही समजता तसं भारतीय सैन्य दुबळं, कमकुवत आणि भेकड नाही ! कधीच नव्हतं ! १९६२ मध्ये चीनबरोबर झालेल्या लढाईत भारतीय सैन्याची दाणादाण उडाली ! भारताचा दारुण पराभव झाला ! सगळ्या जगात आपली नामुष्की झाली. केवळ व्यक्तिशः माझाच नव्हे तर भारतीय 'जवानां'चा चीनकडून अपमान केला गेला त्याला जबाबदार आम्ही नव्हतो. भारतीय सेना नव्हती ! या पराभवाची जबाबदारी कुणावर होती ? तेच सांगायचं ठरवलंय मी ! ही घ्या खरी 'अनटोल्ड स्टोरी !'

...चीन आणि भारत यांच्यांतले युद्ध संपले ही बातमी मला सांगितली होती

ती अखेर एका चिनी मेजरनेच. कशावरून ती खरी समजायची ? माझ्याजवळ रेडिओ नव्हता, वृत्तपत्र नव्हते. माझा वेळ जाता जात नव्हता.

...अखेर ती बातमी खरी ठरली ! ४ मे १९६३ ला बाकीच्या अधिकाऱ्यां-बरोबर चिन्यांनी माझी मुक्तता करून आम्हांला सर्वांना मायदेशी परत पाठविले. चिन्यांनी सोडून दिलेले आम्ही सर्व 'युद्धकैदी' विमानाने मायभूमीत परत येत होतो. आमचे विमान कलकत्त्याच्या मिलिटरी एअर पोर्टवर दुपारी उतरणार होते; पण त्या दिवशी तिथली हवा खराब होती, म्हणून आमचे विमान परस्पर दिल्लीला वळवण्यात आले.

यथायोग्य लष्करी पद्धतीने आमचे 'स्वागत' करण्यात आले, पण का कोण जाणे, मला त्या वेळी हे जाणवले की या स्वागतात कुठेतरी थोडासा दुरावा आहे. हे स्वागत कोरडे आहे. त्याचे कारण मला नंतर कळले. आमच्या स्वागतासाठी आलेले आपलेच लोक असे समजत होते की, आता आम्ही 'भारतीय' राहिलेलो नाही ! चिन्यांनी आमचे 'ब्रेन वॉशिंग' केलेले आहे ! आता काय म्हणावे या कर्माला ? ज्या चिन्यांनी भारत सरकारचेच जवळ जवळ १० वर्षे सतत 'ब्रेन वॉशिंग' केले होते तेच सरकार असे समजत होते, की चिन्यांनी आमचेच 'ब्रेन वॉशिंग' केलेले आहे !

अगदी निःशंक मनाने, कुठलाही विचार न करता आम्हांला अस्पृश्यासारखी वागणूक मिळाली. देशाच्या तथाकथित नेत्यांनी जे करू नये ते केले आणि जे करायला हवे होते ते केले नाही. प्रायश्चित्त घेत होतो आम्ही. पापक्षालन होणार होते ते आमचे. सैन्यातल्या अधिकाऱ्यांचे ! आम्ही चिन्यांच्या तुरुंगात होतो ना ! मला असह्य मनःस्ताप झाला. वाटले उगाच परत आलो. त्यापेक्षा चिन्यांनी तिक-डेच मारून टाकले असते किंवा लढता लढता मेलो असतो तर बरे झाले असते. तो मृत्यू या 'अशा' स्वागतापेक्षा कितीतरी पटीने बरा !

...त्यानंतर आमचे सामान कस्टमच्या अधिकाऱ्यांनी अक्षरशः तपासले. झडती घेतली. त्यांना म्हणे बातमी कळली होती की, ह्याच विमानाने भारतात हाँगकाँग-हून येणारी काही 'मंडळी' येताना ट्रॅन्झिस्टर्स आणि छुपा अफूचा साठा आणणार आहेत म्हणून. बातमी खरी असली तरी काय झाले ? आम्ही सैन्यातले अधिकारी पण त्यातलेच होतो ? अफूचाच व्यापार करायचा असता तर चुकूनसुद्धा हातात बंदूक धरली नसती ! मी मनातल्या मनात समजलो की, आपला देश अजून सुधार-लेला नाही. सगळे होते तसेच चालू आहे !

बाकीची सव्यापसव्ये नेहमीच्या पद्धतीने आणि जलदगतीने पार पडली. . .आणि मला हुकूम मिळाला की, चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल जे. एन्. चौधरी यांना मी शक्यतितक्या लवकर भेटावे. त्याप्रमाणे १५ मे १९६३ ला मी जनरल चौधरींना भेटलो. आमच्या या भेटीत त्यांनी मला हुकूम दिला की, त्यांच्या स्वतःच्या आणि

संरक्षण मंत्र्यांच्या माहितीसाठी लडाख आणि नेफामध्ये जे काही घडले ते कसे घडले, का घडले याचा साद्यंत लेखी अहवाल मी त्यांना द्यावा. हेतू काय ? जनरल चौधरींच्याच शब्दांत सांगायचे तर ' म्हणजे निदान आम्हांला हा तर धडा शिकायला मिळेल की यदाकदाचित भविष्यकाळात पुन्हा कधी चीनबरोबर युद्ध झालेच तर चिन्यांच्या सहज भक्ष्यस्थानी पडेल अशा तऱ्हेने आपली ' ब्रिगेड ' कशी पाठवायची नाही !' जनरल चौधरी पुढे म्हणाले, " आपला पराभव झाल्यापासून आपले सैन्य म्हणजे जगातल्या नामवंत राष्ट्रांना एक कुचेष्टेचा आणि हास्यास्पद विषय झालाय ! " जनरल चौधरींनी आपल्या राष्ट्राच्या सैन्याची कुचेष्टा करणाऱ्या नामवंत राष्ट्रांची सांगितलेली नावे मी इथे देत नाही. उगाच फट् म्हणता ब्रह्महत्या व्हायची !

जनरल चौधरी यांच्या या हुकमाचे मी स्वागतच केले ! चीनबरोबर झालेल्या लढाईत आपला दारुण पराभव का झाला ? कसा झाला ? कोणामुळे झाला ? त्याची खरी कारणे कोणती ? हे सगळे एकदा खरे खरे लिहून काढावे असे वाटतच होते मला. जनरल चौधरींचा हुकूम म्हणूनच मला ही इष्टापत्ती वाटली ! लिहिताना कुठे चूक तर होणार नाही ना ? काही चुकीची माहिती तर दिली जाणार नाही ना ? म्हणून मी लेफ्टनंट कर्नल एम्. एस. रीख, (कमांडिंग ऑफिसर २ रजपूत), लेफ्टनंट कर्नल बी. एस. आलुवालिया, (कमांडिंग ऑफिसर १/९ गुरखाज्), मेजर आर. ओ. खरबंडा आणि कॅप्टन टी. के. गुप्ता या सैन्याधिकाऱ्यांना वेळोवेळी भेटलो, त्यांच्याशी चर्चा केली. मी चुकत नाही ना, याची पुन्हा पुन्हा खात्री पटवून घेतली आणि ' रिपोर्ट ' तयार करून जनरल चौधरींना स्वतः नेऊन दिला. त्या माझ्या अहवालाचे पुढे काय झाले, ते कळायला मार्ग नाही. कारण, त्या अहवालाबाबत आजपर्यंत मला कसलीच विचारणा करण्यात आलेली नाही. कदाचित त्या माझ्या अहवालातली काही वाक्ये दिल्लीतल्या काही हळव्या मनोवृत्तीच्या लोकांना चांगलीच लागली असतील आणि म्हणूनच ही ' तेरी भी चूप, मेरी भी चूप ' !

ती वेळच अशी होती की, ६२ च्या पराभवाची जबाबदारी लोक फक्त सैन्यावर टाकत होते. ही विचारसरणी पाहून मी अस्वस्थ झालो. मनात म्हटले, ' माझ्या देशातले लोक आणि माझे मित्र ६२ च्या पराभवापासून काही धडा शिकतील का ? आधुनिक पद्धतीचे युद्ध म्हणजे काय, हे आतातरी लक्षात घेण्याचा प्रयत्न करतील का ? खरे काय घडले तेच मी सांगावे या माझ्या निश्चयाला पाठिंबा देतील का ?"

६२ च्या पराभवाची जबाबदारी खरे सांगायचे तर प्रत्येक भारतीय माणसावर आहे. युद्धात सैन्याची रचना कशी करायची, कुठला हुकूम दिला तर काय होईल याचा विचार वरिष्ठ सैन्याधिकारी करीत नव्हते. राष्ट्रवाद असा कुठे सामान्य

माणसांत नव्हताच. जनता जागृत नव्हती. लोकसभेत विरोधी पक्षाचे सभासद फक्त जुजबी प्रश्न उपस्थित करीत होते, वृत्तपत्रे त्यांचे काम चोख बजावीत नव्हती. बातम्या येत होत्या त्या फक्त कुठल्या मंत्र्याने कशाचे उद्घाटन केले, काय आश्वासन दिले याच्या. राष्ट्रवाद हा भारतीय माणसाच्या मनातदेखील कुठे रुजला नव्हता.

लोकांना त्या वेळी खरी माहिती द्यायला हवी होती; कारण भारतीय म्हणून जन्मलेल्या माणसात ' राष्ट्रवाद ' असतोच असतो, त्याला फक्त पेटवावा लागतो. भारतीय जनता खवळली म्हणजे ' आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना ! ' अशी राज्यकर्त्यांची स्थिती होते. आणि म्हणूनच राज्यकर्त्यांनी ' जनते 'ला त्या वेळी अंधारात ठेवले. ' नॅशनल सिक्युरिटी ' हा गोंडस शब्द वापरून त्यांनी सत्य दडवून ठेवले.

१९५४ ते १९६२ या ८ वर्षांच्या कालखंडात चीन-भारत यांच्यांतल्या सीमा-वादाशी जवळचा संबंध येणे हे माझ्या नशिबात होते. शेवटी तर लडाखमध्ये आपली जी तुकडी चिन्यांबरोबर लढली त्या तुकडीचा मी ब्रिगेडियर इन् चार्ज होतो ! हे मी मोठेपणा म्हणून सांगत नाही. सांगायचा हेतू एवढाच की, लडाख-मध्ये काय झाले, कसे घडले, का घडले हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. अनुभवलेले आहे. युद्धाची तयारी आणि पूर्वसूचना नसतानाच आपल्या एका ' ब्रिगेड 'चा अक्षरशः कसा धुव्वा उडाला त्याचा हा रक्तरंजित इतिहास आहे. मुद्दाम खपली काढून जखम उघडी करावी, असा माझा हेतू नाही. पण जखम चांगली बरी व्हावी असे वाटत असेल तर ती उघडी करावीच लागते. लवकर बरे व्हावे म्हणून !

२० ऑक्टोबर १९६२ ला पहाटे ५ वाजता अक्षरशः मुंग्यांसारख्या जमा झालेल्या राक्षसी चिनी फौजा दुबळ्या भारतीय सेनेवर तुटून पडल्या. चिनी फौजा झुंडीच्या झुंडीने हल्ले चढवीत राहिल्या आणि जवळजवळ अवघ्या तीन तासांत हे विजोड युद्ध संपले होते ! भारताचा पराभव झाला होता. भारताची १६० मैल भूमी चिन्यांनी व्यापून टाकली होती. सेला खिंड गेली, बोम-दिला पडले. २० नोव्हेंबरला तर चिनी सैन्याला आसाममध्ये घुसण्याचा मार्ग मोकळा झाला. चिनी फौजांना इतके प्रचंड आणि आश्चर्यकारक यश मिळाले, की, खुद्द चिनी सेन्या-धिकाऱ्यांना त्यांच्या ' गरुडझेप ' यशाचे आश्चर्य वाटले ! अवघ्या ३ तासांत शूर-वीर म्हणून त्रिखंडात गाजलेल्या भारतीय सैन्याची पिछेहाट झाली. का हरलो आपण ? हरणारच होतो ! लढाई म्हणजे जुन्या बंदुका हातांत घेऊन पुढे धावत सुटणे नव्हे. लढाई म्हणजे गंमत नव्हे. त्यासाठी तयारी लागते. योजना लागते. चिन्यांना सहज यश मिळाले. कारण या लढाईची तयारी ते अनेक वर्षे करीत होते. आपला चीनकडे बघण्याचा राजकीय दृष्टिकोण आणि आपली तथाकथित ' नॅशनल पॉलिसी ' (?) चुकत होती. लढाईची तयारी करीत नव्हतो फक्त

आपण. भारताचे राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी, आपल्या या पराभवानंतर स्पष्ट कबुलीच दिली की, आपण निष्काळजी आणि भोळसट होतो ! पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू पराभवानंतर म्हणाले की, " चिन्यांनी आमचा विश्वासघात केला, आमच्या पाठीत खंजीर मारला ! " त्या वेळी रेडिओवरून भाषण करताना पंडित नेहरू म्हणाले की, " आपल्या फौजा मागे हटाव्यात हे पाहून मला दु:ख होतं. चिनी प्रचंड संख्येनं आले आणि त्यांची आयुधं आपल्यापेक्षा अधिक चांगली होती ! " प्रत्यक्ष देशाच्या पंतप्रधानांचा आणि राष्ट्रपतींचा हा कबुलीजबाब पाहिला की आपल्याला वाईट वाटते, मस्तक कसे सुन्न होऊन जाते.

भारताचे संरक्षणमंत्री (!) श्री. वेंगालिल कृष्णन् कृष्ण मेनन म्हणाले की, " चिन्यांची लढाईची तयारी आपल्यापेक्षा अधिक चांगली होती म्हणून आपला पराभव झाला. " नशीब ! उशिराने का होईना पण तेवढे तरी समजले.

चीनची ही जबरदस्त लढाईची तयारी काय अचानक झाली ? एकदम झाली? आपला पराभव चिन्यांनी केला नाही. आपला शूर ' जवान ' इतका भेकड नाही. आपला पराभव झाला तो आपल्यामुळे. आपल्याच सरकारच्या भोळसट पॉलिसी (!)–मुळे ! चीनला आपले सरकार नीट ओळखू शकले नाही. चीन या लढाईची तयारी अनेक वर्षे करीत होता. ६२ मध्ये भारताबरोबर चीन प्रत्यक्ष युद्धात पडला. जिंकला. पण त्या लढाईच्या दृष्टीने त्यांनी पहिले पाऊल टाकले होते ते १९५० मध्ये. १२ वर्षांपूर्वी. आंतरराष्ट्रीय युद्धे अचानक आणि एकदम होत नसतात. प्रत्येक लढाईला फार जुनी ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. आपल्या देशाच्या सीमा कुठल्या, शेजारच्या देशांच्या कुठल्या, ह्याची 'मिनिस्ट्री ऑफ एक्सटर्नल अ‍ॅफेअर्स 'ला चांगली माहिती असावी लागते. डोळ्यांत तेल घालून राष्ट्राच्या सीमा जपाव्या लागतात. पुष्कळदा असे घडते की, जगातली दोन कुठली तरी राष्ट्रे आपसांत भांडतात. एकमेकांशी लढतात. पण त्या लढाईचा परिणाम म्हणून शेवटी आपल्या राष्ट्राच्या सीमांना धोका निर्माण होणार असेल तर ? आपण काय स्वस्थ बसायचे? शांततेचा जप करायचा ? आपण मध्ये पडलेच पाहिजे. ठणकावून सांगितले पाहिजे की, हे भांडण फक्त तुमच्या दोघांतलं नाही. लढाई होणार आहे ती आमच्या देशाच्या सीमांच्या जवळ. आणि म्हणून आमचादेखील तुमच्या लढाईशी संबंध आहे. मग भांडण आमच्याबरोबर असो किंवा नसो. चीनच्या बाबतीत आपण प्रथम चुकलो ते इथेच. ७ ऑक्टोबर १९५० ला चीनने तिबेटवर आक्रमण केले. फौजा घुसवल्या ! मुक्तिसेना ! जिवाच्या आकांताने तिबेट ओरडले, ' आम्हांला मदत करा ! मदत करा ! ' तिबेटच्या सीमेला भारताची सीमा चिकटून आहे. पण केली तिबेटला मदत भारताने ? नाही. आपण स्वस्थ बसलो. एवढी साधी गोष्ट कळायला हवी होती की, चीन आणि भारत यांच्यामध्ये तिबेट हे बफर स्टेट आहे. आणि तिबटवरच्या आक्रमणाने चीनसारखे प्रबळ, आक्रमक वृत्तीचे कपटी

राष्ट्र आपल्याजवळ शक्यतो येऊ देता कामा नये. 'बॉर्डर प्रॉब्लेम' निर्माणच झाला नसता. चिनी सैन्य तिबेटमध्ये घुसले याचाच अर्थ केव्हाना केव्हा तरी ते भारतात घुसणार. त्यापेक्षा चिन्यांना तिबेटमध्येच घुसू देता कामा नये. मग भले भारताला जरूर नसताना युद्धात पडावे लागले तरी चालेल. कारण, चीन-तिबेट यांच्या तंट्यात भारताचा संबंध होता, असा विचार केला कुणी? नाही. आपण फक्त बघत राहिलो. स्वस्थ बसलो. त्याच वेळी डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी भविष्य सांगून ठेवले होते की, 'आता एक दिवस असा उजाडेल की, जेव्हा भारताला चीनबरोबर तिबेटमध्येच लढावं लागेल!' भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे रक्त त्या वेळी उसळले. 'चीनला आत्ताच दणका द्या.' हा त्यांचा पंडित नेहरूंजवळ आग्रह होता. पण दुर्दैव या देशाचे, की सरदार वल्लभभाई पटेल यांचे त्याच काळी निधन झाले. देशाला कुणी दूरदृष्टीचा खंबीर नेताच उरला नाही. देश पोरका झाला. प्रा. एन्. जी. रंगा यांनी १९५० मध्येच भर लोकसभेत पंडित नेहरूंना समज दिली होती की, 'चीननं तिबेटवर आक्रमण केलं. आता आपल्या देशाच्या सीमांनाच धोका उत्पन्न झालेला आहे. या बाबतीत पंतप्रधान! तुम्ही इतके निष्काळजी कसे?'

असे म्हणतात की, भारताचे चीनमधले पहिले वकील सरदार के. एम्. पणिक्कर यांनी पंतप्रधान पंडित नेहरू यांना असा सल्ला दिला होता की, तिबेट आणि चीन यांच्या आपसातल्या भानगडीत तुम्ही लक्ष घालू नका!' पंडित नेहरू म्हणाले, "तिबेट हे सार्वभौम राष्ट्र म्हणून राहिलं काय किंवा चीनचा एक भाग म्हणून राहिलं काय, आपल्याला तिबेटमध्ये फौजा पाठवून हस्तक्षेप करण्याचा हक्कच काय?"

सार्वभौमत्व म्हणजे काय, याचीच लोकसभेत माथेफोड करण्यात आली आणि एवढे करून शेवटी काय झाले? तिबेटमध्ये भारतीय सैन्य घुसले? छे: छे: भलतेच! शांतता, शांतता! भारताकडून चीनला फक्त निषेध खलिता गेला की, 'तुम्ही तिबेटवर आक्रमण केलंत ही गोष्ट चांगली नाही हं! तुम्ही तिबेटवर आक्रमण करावं हे पाहून (नुसतं पाहूऽन!) आम्हांला आश्चर्य वाटतं आणि दुःख होत आहे!' आपल्या ह्या तीव्र भाषेत लिहिलेल्या खलित्याला चीनकडून जबाब आला, तुम्ही काळजी करू नका. तुम्हांला धोका नाही.' आणि आपल्या सरकारचा त्यावर विश्वास बसला.

डॉ. शामाप्रसाद मुकर्जीसारखी फार थोडी माणसे सोडली तर सर्वसामान्य माणसे आपल्या देशाच्या भवितव्याबाबत इतकी सुस्त होती की, त्यांच्यापैकी कित्येकांना जगाच्या नकाशात 'तिबेट तिबेट' म्हणून मी हल्ली पेपरला वाचतो ते नक्की आहे तरी कुठे, हे दाखवता आले नसते. आपले 'मिनिस्ट्री ऑफ एक्स-टर्नल अॅफेअर्स' त्या वेळी काय करीत होते? 'युनायटेड नेशन्स'मध्ये आपली

'काश्मिर केस' भक्कम व्हावी म्हणून देशोदेशींच्या राजकारणी बुद्धिवाद्यांशी फक्त चर्चा करीत होते. पंडित नेहरू नेहमीप्रमाणे जगाच्या चिंतेत होते. आपले भारतीय सैन्य कोरियात होते. चीनबरोबर तिबटच्या प्रश्नावर आत्ताच लढाई पुकारून तिसरे महायुद्ध भारत सरकारला सुरू करावयाचे नव्हते. भावना ही होती की, चीन आपल्याला कधी त्रास देणार नाही. दरवाजापर्यंत चीन आला, येऊ दे. आत येणार नाही हे नक्की. आपल्या देशातले कम्युनिस्ट या गोंधळात आणखी भर घालीत होते. भर लोकसभेत चीनने तिबेटवर केलेल्या आक्रमणाचे ते समर्थन करीत होते.

त्याच वेळी घडलेला एक प्रसंग मला आठवतो. सांगण्यासारखा आहे. ऑक्टोबर १९५० मध्ये दक्षिण हिंदुस्थानातल्या 'डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज, वेलिंग्टन', या सैनिकी कॉलेजात मी विद्यार्थी म्हणून होतो. लेक्चर चालू होते. चीनने तिबेट-वर आक्रमण केल्याची बातमी कळली मात्र, कमांडंट जनरल Lentaigne हा ब्रिटिश सैन्याधिकारी लेक्चर हॉलमध्ये घुसला. त्याने चालू असलेले लेक्चर थांब-वले आणि आपल्या देशाच्या नेत्यांची निर्भर्त्सना सुरू केली ! ते म्हणाले, "किती मूर्ख आहेत तुमचे नेते. पुढचा मागचा विचार म्हणून त्यांना काही आहे का नाही ? चीन तिबेटमध्ये घुसला आणि तुम्ही नुसते बघत काय बसलात ? चीनचं तिबेटवरचं आक्रमण तुम्ही सहन केलंत याचाच अर्थ चोराला पाठीमागचा दरवाजा तुम्ही उघडून दिलात. (India's back door has been opened) आता तो काय पुढच्या दारापर्यंत आल्याशिवाय राहील ? चीनसारख्या, फार मोठ्या, प्रबळ आणि आक्रमक वृत्तीच्या राष्ट्राबरोबर तुमच्या सीमा भिडल्या. मध्ये फक्त हिमालय. आता काय तुम्हांला हे सांगायला पाहिजे का, की पुढे काय होणार आहे ते ? आज ना उद्या चीन भारतावर आक्रमण करणार हे नक्की. तिबेटपासून भारताची सीमा फक्त एका बॉम्बच्या अंतरावर आहे. काय तयारी आहे तुमची ? त्या कठीण प्रदेशात अजून रस्ते बांधलेले नाहीत. सैन्य वाढवलेलं नाही. तुमच्या-कडे अद्ययावत शस्त्रास्त्रं नाहीत. इंडियन एअर फोर्स आणि इंडियन नेव्ही यांच्यांतदेखील अजून बरीच सुधारणा करायला हवी." आणि शेवटी हाडाचा सोल्जर असलेला तो ब्रिटिश जनरल म्हणाला, "माझी खात्री आहे की, तुम्हा विद्यार्थ्यांना सैन्यातून रिटायर्ड होण्यापूर्वीच चिन्यांशी लढावं लागेल !" किती बरोबर ठरली ही त्यांची भविष्यवाणी ? माझ्याच वर्गात असलेला, माझ्याच वयाचा असलेला, माझ्याच बाकावर त्या वेळी बसलेला लेफ्टनंट कर्नल 'बाजी' मेहता ६२ मध्ये चीनबरोबर झालेल्या युद्धात मारला गेला ! मला युद्धकैदी म्हणून चिन्यांनी अटक केली. पण त्या वेळी मात्र आम्ही 'विद्यार्थी' एका ब्रिटिश जनरलने आमच्या देशातल्या नेत्यांना मूर्ख म्हणून म्हणावे यावरून त्याच्यावरच संतप्त झालो होतो.

त्यानंतर १९५१ मध्ये आपल्या परराष्ट्रखात्यामधील एक वरिष्ठ अधिकारी आमच्या कॉलेजमध्ये ' चीन-तिबेट यांचे ऐतिहासिक संबंध ' या विषयावर आम्हांला व्याख्यान देण्यासाठी आले. त्यांनी पुन्हा हेच प्रतिपादन केले की, चीनने तिबेटवर आक्रमण केले त्या वेळी आपण मध्ये पडलो नाही हेच बरे केले. चीनचे तिबेटवरचे आक्रमण क्रूर असेल, पण चीनचा तिबेटवर कायदेशीर हक्क आहे हे नाकबूल करता येणार नाही. त्यांनी पुढे बौद्ध धर्माचा तिबेटमध्ये झालेला प्रसार आणि तिथल्या कुठल्या राजकन्या कुठल्या चिनी माणसाच्या प्रेमात कशा पडल्या होत्या (!) याच्या अरबी भाषेत नसलेल्या आणि तरीदेखील सुरस आणि चमत्कारिक असलेल्या अनेक गोष्टी आम्हांला सांगितल्या. आणि शेवटी ' साहेबां 'नी हे सांगितले की, " चीन आणि तिबेट यांचे अनेक वर्षांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संबंध आहेत आणि म्हणूनच चीनने तिबेटवर आक्रमण केलं या गोष्टीकडं फारसं गांभीर्यानं बघण्याचं कारणच नाही. "

ह्याच व्याख्यानाच्या वेळी पुन्हा एकदा त्या ब्रिटिश जनरल Letaigne यांनी ' साहेबां 'ना अनेक खोचक प्रश्न विचारले आणि त्यांच्या लक्षात आणून दिले की, " साहेब ! चीनचा जसा तिबेटवर कायदेशीर हक्क आहे असं तुम्ही म्हणता (की ज्याला काहीही आधार तुम्ही दिलेला नाही ) तसा भारताचा तिबेटवर हक्क नाही ? ( की ज्याला कायदेशीर आधार आहेत) आणि तुम्ही काहीही बोललात तरी एक लष्करी अधिकारी म्हणून मी सांगतो ते ऐका, की " चीनचं तिबेटवरचं आक्रमण ही चिन्यांची भारतावरच्या आक्रमणाची पूर्वतयारी आहे ! "

आणि त्यावर साहेबमजकूर म्हणाले की, " जनरल ! मी फक्त ' चीन आणि तिबेट यांचे ऐतिहासिक संबंध ' या विषयावर बोलण्यासाठी आलो होतो. लष्करी डावपेच हा माझा विषय नव्हे. तो मी तुम्हा सोल्जर लोकांवर सोपवतो. "

स्वतंत्र भारताचे हे नेते आणि अधिकारी इतिहास, राजकारण आणि लष्करी डावपेच या तिन्ही गोष्टी वेगळ्या आहेत असे समजत होते तर.

सरदार वल्लभभाई पटेल हे डिसेंबर १९५० मध्येच वारले. चीनबद्दलच्या आपल्या धोरणात काहीतरी चुकतंय हे प्रत्यक्ष पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंना ठणकावून सांगणारा नेताच गेला. देशाला कुणी वाली उरला नाही. ७ नोव्हेंबर १९५० ला चीनच्या बाबतीत पंडित नेहरूंना समज देणारे पत्र सरदार वल्लभभाई पटेल यांनी लिहिले होते. ते मुळातच वाचण्यासारखे आहे.

भारतावर १९६२ साली आक्रमण करण्याची तयारी १९५० मध्ये तिबेटवर आक्रमण करून चीनने केली. आणि तिबेटवर आक्रमण करण्याची तयारी चीन केव्हापासून करीत होता ? १९२२ सालापासून. प्रत्यक्ष आक्रमण करण्यापूर्वी ३८ वर्षे ! १९२२ मध्येच 'दी चायनीज कम्युनिस्ट पार्टी 'ने जाहीर केले होते की,

" एक ना एक दिवस आम्ही तिबेटची मुक्तता करू आणि आपल्या मायभूमीबरोबर तिबट संलग्न करू ! "

४ ऑगस्ट १९५० लाच जनरल ली-पो-चेंग म्हणाला होता की, " चीनसारख्या महान् कुटुंबात तिबेटने पुन्हा एकदा परत येऊन एकरूप व्हावं यासाठी आणि चीनच्या दक्षिण व पश्चिमेकडच्या संरक्षणाच्या दृष्टीनं चिनी फौजांनी तिबेटवर आक्रमक हल्ला करायलाच पाहिजे ! "

१९०४ मध्ये हिंदुस्थान पारतंत्र्यात होता. राज्य ब्रिटिशांचे होते. आणि तरीदेखील लॉर्ड कर्झनने यंगहजबंड नावाच्या ब्रिटिश सैन्याधिकाऱ्याला तिबेटवर हल्ला करायचा हुकूम दिला. का ? कारण, त्याला अशी शंका आली की, दलाई लामा आणि रशियाचे प्रतिनिधी यांचा आपसात ब्रिटिश भारताविरुद्ध काही गुप्त करार झालेला आहे ! १९०४ मध्ये लॉर्ड कर्झन या ब्रिटिश माणसाला जे कळले ते आपल्या स्वतंत्र भारताच्या नेत्यांना १९५० मध्ये कळले नाही. लॉर्ड कर्झनला हे ठाऊक होते, की तिबेट हाच भारताचा खरा ' गेट वे ऑफ इंडिया ' आहे. तिबेटवरचा ताबा सुटला की हिंदुस्थानला—ब्रिटिश इंडियाला—धोका आहेच. लॉर्ड कर्झनच्या हुकूमावरून निघालेला तो यंगहजबंड हां हां म्हणता तिबेटवर चाल करून गेला. ल्हासा पडले आणि दलाई लामाला पहिला शांततेचा करार करावा लागला तो ब्रिटिश इंडियावरोबर. पर्यायाने भारताबरोबर आणि तोदेखील १९०४ मध्ये. तिबेटच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटिशांचे बारीक लक्ष असे. कशासाठी ? ब्रिटिश इंडियाच्या संरक्षणासाठी, की ज्या महत्त्वाच्या गोष्टीकडे भारत सरकारने दुर्लक्ष केले. ब्रिटिश इंडिया आणि तिबेट ह्यांच्यांतला हा १९०४ चा शांततेचा करार १९०६ मध्ये चीनने मान्य केला होता. पर्यायाने भारताचा तिबेटवरचा अग्रहक्क चीनने मान्य केला होता. कारण राज्य ब्रिटिशांचे असले तरी देश भारतच होता. राज्यकर्ते बदलतात. राष्ट्र नेहमीच कायम असते. चीनने या कराराला मान्यता दिली. कारण त्या वेळी चीन हे एक दुबळे राष्ट्र होते. ब्रिटिश जोरात होते. चीनने मान्यता दिलेल्या या तिबेट आणि भारत यांच्यांतल्या कराराला म्हणतात, 'अँग्लो–चायनीज ट्रीटी ऑफ १९०६.' तत्पूर्वी इ. स. १७२० मध्ये चिनी फौजा तिबेटमध्ये घुसल्या होत्या. कशासाठी ? फक्त एवढेच बघण्यासाठी की चीनविरुद्ध झालेल्या एखाद्या गुप्त करारात तिबेट सामील नाहीना ? ( To forestall a suspected Tibetean–mongol alliance against China) मात्र तिबेटने तसा कुठलाही गुप्त करार केलेला नाही अशी खात्री पटल्यावर चिनी परत गेले होते. तिबेट हा चीनचाच भाग आहे, असा त्या वेळी त्यांचा दावा नव्हता. त्यानंतर १८५० पासून चीनचा तिबेटवरचा ताबा कमी कमी होत गेला होता, हा इतिहास आहे. तिबेटी जनता त्यांचा दलाई लामा स्वतःच निवडीत होती. चीनला न विचारता. संबंधच काय चीनचा ? त्या वेळी चीन गडबड करीत नव्हता. कारण तेवढी ताकद नव्हती. १९१२ मध्ये तिबेटी लोकांनी चीनला

पूर्णपणे झुगारून दिले आणि दलाई लामाच गादीवर बसला. चीनने थोडीशी कुरकूर करतात्र ब्रिटिश सरकारने चीनला दम दिला की, 'याद रख! तिबेट या स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राने ब्रिटिश इंडियाबरोबर १९०४ मध्येच एक करार केलेला आहे की जो करार १९०६ मध्ये चीनने ब्रिटिश इंडियाबरोबर वेगळा करार करून कायम केला आहे. आता जर तिबेटमध्ये ढवळाढवळ कराल तर ब्रिटिश सरकार स्वस्थ बसणार नाही !'

इ. स. १९१३ मध्ये तिबेटने संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. ब्रिटिश सरकारने १९१४ मध्ये भारतातच सिमला येथे एक बैठक घेतली की जिला तिबेट, चीन आणि भारत यांचे प्रतिनिधी हजर होते. त्याच वेळी चीनने हे कबूल केले होते की चीनचा तिबेटवर कसलाही हक्क नाही ! चीन तिबेटला स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता देत आहे. चीन तिबेटच्या अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ करू इच्छित नाही. तसा करार त्या वेळी सिमला येथे करण्यात आला. तिबेट आणि ब्रिटिश इंडिया यांच्या सीमारेषा चीनने मान्य केल्या होत्या. हीच ती सुप्रसिद्ध मॅकमोहन रेषा की जिथे हिंदुस्थानची सरहद्द संपते आणि तिबेटची सुरू होते असे खुद्द चीनने १९१४ मध्ये मान्य केले होते.

चीनने पुढे आपला शब्द फिरवला. भारतातून ब्रिटिश निघून गेल्यावर चीनने जाहीर केले की मॅकमोहन रेषा ही तिबेट आणि भारत यांची सीमारेषा आहे हे आम्हांला मंजूर नाही. कारण उघड होते. १९१४ मध्ये सिमल्याला ब्रिटिश इंडिया आणि तिबेट यांच्यांत जो करार झाला होता, त्या वेळी चिनी प्रतिनिधी फक्त हजर होते, पण त्यांनी त्या करारवर सही करून लेखी कबुलीजबाब दिलेला नव्हता.

१९१४ मध्ये पहिले महायुद्ध झाले त्या वेळी तिबेटने स्वतःचा 'फॉरेन अॅफेसर्स ब्युरो' उघडला होता. त्याच्याशी चीनचा काही संबंध नव्हता. दुसऱ्या महायुद्धात चीनने भाग घेतला होता तर तिबेट हे त्या वेळी तटस्थ राष्ट्र होते. एवढेच नव्हे, दुसरे महायुद्ध चालू असताना चीनने तिबेटवर दबाव आणण्याचा प्रयत्न करून तिबेटला विनंती—लक्षात घ्या !—केली होती की, 'चिनी सैन्य तिबेटमधून जाण्यासाठी तिबेटने परवानगी द्यावी.' आणि चीनची ही तथाकथित विनंती कुठल्याही दडपणाला न भिता तिबेटने फेटाळून लावली होती. १९४७ साली तिबेटियन ट्रेड मिशन परदेशी गेले ते तिबेटियन पासपोर्टवर, चायनीज पासपोर्ट घेऊन नव्हे. अशा स्थितीत १९५० मध्ये चीन कुठल्या पुराव्यावर सांगू शकला की, तिबेट हा चीनचाच एक भाग आहे म्हणून ? पुरावा कुठला ! फक्त चीनची जबरदस्त लष्करी ताकद आणि इतर राष्ट्रांची बघ्यांची भूमिका.

उलट पुरावा हेच दाखवतो की, चीनचा तिबेटवर कसलाही हक्क नव्हता. ब्रिटिशांचा ल्हासा येथे असलेला शेवटचा अधिकारी म्हणतो की, "१९१२ नंतर तिबेटमध्ये औषधालादेखील चिनी नव्हता."

१९४२ च्या चळवळीत गाजलेले जयप्रकाश नारायण लिहितात, ‘ १९१२ ते १९५० या प्रदीर्घ कालखंडात चीनचा तिबेटवर कुठल्याही प्रकारचा तावा नव्हता. ’

चीनचा तिबेटच्या बाबतीत हा चावटपणा चालू होता तेव्हाच भारताने चीन-विरुद्ध आवाज उठवायला हवा होता. जागतिक मत आपल्या बाजूने तयार करायला हवे होते. चीनला ठणकावून बजावायला हवे होते की, ‘ तिबेटवर तुमचा कुठलाही हक्क नाही, असलाच तर तो आमचा आहे. कारण तिबेटने करार केलेले आहेत ते ब्रिटिश इंडियाबरोबर, म्हणजेच पर्यायाने आमच्याबरोबर. एवढे कळवूनदेखील तिबेटमध्ये काही गडबड कराल तर भारत सरकार स्वस्थ बसणार नाही. ’

पण झाले भलतेच ! आपण काय केले ? चीनकडून आपल्याला धोका नाही या भोळसट समजुतीखाली राहून खुद्द भारत सरकारनेच चीनच्या तिबेटवरच्या आक्रमणाचे समर्थन केले. तिबेटच्या संयुक्त राष्ट्रसंघातल्या अपिलाला भारताने विरोध केला. २३ नोव्हेंबर १९५० ला भारताचा युनोमधला प्रतिनिधी तिबेटला विरोध करताना म्हणतो, “ तिबेटचा प्रश्न चर्चेला घ्यायचं काही कारणच नाही. कारण आमच्या सरकारच्या माहितीप्रमाणं चीन आणि तिबेट ही दोन्ही राष्ट्रं त्यांच्यातले प्रश्न शांततापूर्ण वाटाघाटींच्या मार्गानं आपसात सोडवणार आहेत. ”

संयुक्त राष्ट्रसंघातले बाकीच्या राष्ट्रांचे प्रतिनिधी मनातल्या मनात हसले असतील. म्हणाले असतील, “ चीन आणि तिबेट यांच्या भांडणात स्वतःच्याच संरक्षणाच्या दृष्टीने, सगळ्यात जास्त लक्ष घालायला हवं होतं ते भारताच्या प्रतिनिधीनं, पण इथं भारताचाच प्रतिनिधी म्हणतोय की, ‘ तिबेटच्या प्रश्नावर चर्चा नको ! ’ आमचं काय जातंय ? तिबेटवर चर्चा नको तर नको ! ”

१९५० च्या डिसेंबरमध्ये तिबेटचा प्रश्न भारताने हा असा सोडवला. आपले राष्ट्र दुबळे होते, अज्ञानात तरी होते किंवा भोळसट होते. चीनला तिबेटमध्ये का घुसलास ?’ म्हणून खडसावायची ताकद नव्हती. आपण तटस्थ होतो, शांततेचा जप करीत होतो. चीनची मैत्री आणि खोटे प्रेम आपण काहीही करून मिळवायचा प्रयत्न करीत होतो. पंडित नेहरूंनी त्या वेळी पार्लमेंटला या घटना सांगितल्यादेखील नाहीत. पार्लमेंट ! देशाची सार्वभौम सत्ता ! तीच मुळी अंधारात, मग इतरेजनांची काय कथा ? एवढेच नव्हे तर पुढे, सर्व गोष्टी स्पष्ट झाल्यावर लोकसभेत विरोधी पक्षांच्या खासदारांनी चीनच्या प्रश्नावर जेव्हा फारच गहजब केला, तेव्हा पंतप्रधान पंडित नेहरूंनी थंडपणे उत्तर दिले—“ भारत-चीन सीमावादाची चर्चा लोकसभेत करावी असं कुठलंच तात्कालिक कारण घडलं नव्हतं. तुम्हांला वाटलं तर मला मर्ख म्हणा. (Foolishly, if you like) मी विचार केला की, या प्रश्नात चर्चा करण्यासारखं काहीच नाही ! ”

दोन महत्त्वाच्या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष केले. प्रबळ चीन म्हणजेच आक्रमक चीन हे आपण ओळखले नाही. आज हजारो वर्षे तिबेट आपला शेजारी होता.

तिबेट आणि भारत यांच्या सीमारेषा कधीही दोघांनी आखून घतल्या नव्हत्या. रुढी, चालिरीती, रिवाज, यांवरच अवलंबून राहून शेजारी-शेजारी राष्ट्रे म्हणून युद्ध न करता आपण राहिलो. पण आपल्या सरकारला हे कळायला हवे होते की, चीन म्हणजे तिबेट नव्हे. चीनला तिबेटमध्ये घुसू देणे म्हणजे चीनला भारतात घुसण्याचे आमंत्रण देण्यासारखे आहे.

निदान एवढे तरी करायला हवे होते की, आता चीन आपल्या दरवाजापर्यंत आलेला आहे, आता तो आपल्याबरोबर नक्की गडबड करील, हे धरून चालून युद्धाची जय्यत तयारी ठेवायला हवी होती. तलवारीला तलवार मिळेल असे चीनला सांगायची तयारी हवी होती. आपण ह्यातले काहीच केले नाही.

चीनचे तिबेटवरचे आक्रमण आणि त्यावरची आपली तटस्थता हे फक्त एकच ६२ च्या पराभवाचे कारण नव्हे ! अशी आणखी अनेक कारणे आहेत की, ज्यांमुळे चीनबरोबर झालेल्या युद्धात आपला फज्जा उडाला, सगळ्या जगात आपली नाचक्की झाली. ती कोणती ? (क्रमशः)


" सारे जग श्वास रोखून बसेल "

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

नाझी भस्मासुराचा

उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.

# तु म चे भ वि ष्य

# आ म चा अं दा ज

**मेष :** सूर्याचे सहकार्य फक्त याच आठवड्यात आपणांस लाभू शकेल. त्याचे व्ययस्थानी गमन घडताच तो मग तुमच्यासाठी काहीही करू शकणार नाही.

साडेसाती सुरू आहेच. आठवा मंगळही तुमच्या पाठीशी हात धुऊन लागलेला आहे. अशा वेळी जपून, सावधानपणे वागल्याशिवाय या अनिष्ट कालापुढे निभाव लागणार नाही.

कोणत्याही कार्यात साहस करण्यासारखे हे दिवस नाहीत. उद्योगधंद्याचे जुने तंत्र बदलावे लागेल, इष्टमित्रांचे सहकार्य घ्यावे लागेल, प्रकृती आणि प्रतिष्ठा यांची सतत काळजी घ्यावी लागेल.

दि. १२ ते १४ थोडेफार अनुकूल दिवस.

**वृषभ :** वृश्चिकेच्या मंगळाने तुमचे स्वास्थ्य नष्ट केले आहे. विरोधकांचा छळवाद, नोकरीधंद्यातील पेचप्रसंग आणि कौटुंबिक कटकटींना उधाण या गोष्टी सतत जाणवत राहिल्याने तुम्ही अगदी बेचैन झाला आहात. एकच एक आशास्थान, पंचमांतील गुरू. तो याही प्रसंगामधून तुम्हांला बाहेर काढील. सांपत्तिक ताण कमालीचा जाणवत राहील, सहकारी कोणत्याही क्षणी आपला पवित्रा बदलतील.

त्यातून साडेसाती सुरू झालेली आहे. अशा अनिष्ट कालावर एकच एक उपाय निष्ठा, निर्धार आणि आत्मसंयमन.

नव्या व्यवसायधंद्यात भाग घेऊ नका. उद्योगधंद्यात प्रत्येक गोष्ट सावधपणे करा.

दि. १३–१४ पासून थोडाफार अनुकूल काल.

**मिथुन :** षष्ठातील स्तंभी मंगळ व्यावसायिक दृष्टीने सामान्यपणे ठीक जाणवला तरी, अनारोग्य आणि वाढता खर्च या बाबतींत तो तुम्हांला अगदी टेकीस आणील.

राहत्या जागेच्या समस्या सोडवाव्या लागतील, अनेकांच्या मदतीने त्या सुटतीलही, पण त्यासाठी खूपच परिश्रम करावे लागतील.

## श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. ८ ते १४ मार्चचे राशिभविष्य

हे दिवस एकंदरीत स्वास्थ्याचे आणि समाधानाचे जाणवणार नाहीत. कुटुंबियांच्या खस्ता खाव्या लागतील, स्वतःच्या अनारोग्याच्या कटकटीही मधून मधून जाणवायला लागतील.

पण सामाजिक प्रतिष्ठेला चुकूनही धक्का लागणार नाही, सांपत्तिक अडचण विशेषशी जाणवणार नाही.

दि. ११ ते १३ अनुकूल दिवस.

**कर्क** : या वेळची ग्रहस्थिती आपणांस जे जे अपेक्षित आहे ते ते पदरी पाडून घेण्यास पूर्णत्वाने समर्थ ठरेल. पण प्रयत्नांची शिकस्त करायला हवी.

दशमात शनी आलेला असल्याने कार्यक्षेत्राचे स्वरूप काहीसे बदलावे लागणार आहे. या नव्या क्षेत्रात नव्या जोमाने पाऊल टाकलेत तर तुमची प्रगती निश्चितच वेग घेऊ लागेल.

स्थावराचा प्रश्न मधून मधून त्रास देऊ लागेल, यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रांत थोड्याफार अडीअडचणीही उद्‌भवतील. हवामान पूर्णत्वाने अनुकूल नसले तरी सहसा कोणत्याही क्षेत्रात अपयश घ्यावे लागणार नाही.

दि. ८ ते ११ अनुकूल काल.

**सिंह** : गेल्या आठवड्यातील मंगळ–नेपच्यूनची अस्वस्थता आणि बेचैनपणा या आठवड्यापासून निश्चितच दूर होईल. तरीसुद्धा काही दिवस आपणांस जपूनच राहावे लागणार आहे. चौथ्या मंगळाचा लकडा कित्येक महिने तुमच्यामागे लागणार आहे. तो तुम्हांला सहसा यश मिळवून देणार नाही. सांपत्तिक ताण कमालीचा वाढेल, प्राप्तीचे मान घसरेल, वेळ निभावून जाईलही. पण धावपळ–धडपड सतत करणे भाग पडेल.

सिंह राशीची माणसे अशा अडचणींना मुळीच भीक घालणार नाहीत. उलट परिस्थितीचे आव्हान स्वीकारायला ती एका पायावर तयार असतात.

दि. १३ ते १४ अधिक अनुकूल काल.

**कन्या :** आणखी काही दिवस कन्याराशी व्यक्ती आघाडीवरच राहाव्यात अशीच ग्रहस्थितीची इच्छा दिसते. यामुळे आठव्या शनीची दखल घेण्याची गरजच भासणार नाही.

पराक्रमातील मंगळाचे वास्तव्य दीर्घकालीन असल्यामुळे, कोणत्याही कामात माघार घेण्याचा प्रसंग चुकूनही येणार नाही.

आगामी १–२ महिन्यांत सतत प्रवास घडेल, स्थानांतर-स्थित्यंतरामुळे आपले जीवन अधिक प्रगत व यशस्वी बनेल. गुरु-मंगळांच्या कृपेने तुमचे कर्तृत्व चौफेर धावू लागेल.

वैद्यकीय-संशोधन क्षेत्रांत असे अनन्यसाधारण कार्य आपल्या हातून घडेल की, जगाच्या नजरा तुमच्यावर खिळल्या जातील.

दि. १२ ते १४ यशस्वी व अनुकूल दिवस.

**तूळ :** गुरु-मंगळ आणि शनी यांची सहानुभूती आपण गमावून बसला आहात. यामुळे अपेक्षित यश पदरी पाडून घेणे फारच ताणाचे, त्रासाचे वाटू लागेल.

प्रकृतीचा त्रास आता थोडाफार कमी होईलही पण कौटुंबिक वातावरण अधिक दूषित बनेल. प्राप्ती नेहमीची पण खर्चात मात्र गणित श्रेढीने वाढ होऊ लागल्याने यातून कसे निभावून जाऊ हीच एक चिंता सतत टोचणी देत राहील.

कोणत्याही प्रकारच्या वादविवादापासून चार हात दूरच राहा. लोकांच्या अभिवचनांवर विसंबून राहणे इष्ट ठरणार नाही. दूरच्या प्रवासाचे लांबणीवर टाका.

दि. ११ ते १३ या काली अपेक्षित लाभ पदरी पडावा.

**वृश्चिक :** सध्या तरी निदान तुमच्या राशीतील मंगळाबद्दल धास्ती बाळगण्याचे कारण नाही. गुरू तुमचा पाठीराखा असल्यामुळे, तुमच्या प्रगतीला अडथळे करण्याचे धाडस कोणीही करू शकणार नाही.

वक्री मंगळाचा कालखंड मात्र (दि. २७ एप्रिल ते ७ जुलै) ताणाचा जाणवेल.

आपल्या व्यवसायधंद्यात अनेक सुधारणा घडून येतील, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात येतील. वरिष्ठांचे–धनिकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

नोकरीत बढती–बदलीची लक्षणे दिसू लागतील. व्यावहारिक यश अपेक्षेबाहेर लाभेल. स्थावराच्या आणि वाहनाच्या विवंचना मिटतील.

दि. १०–१३–१४ अपेक्षेप्रमाणे सारे काही घडेल.

**धनू :** सध्याच्या बाराव्या मंगळामुळे अनेक व्यथा-विवंचना तीव्रपणे जाणवायला लागतील. त्याच्या वक्री अवस्थेत तर (दि. २७ एप्रिल ते ७ जुलै) आपणास ब्रह्मांड आठवेल.

असे स्पष्टपणे सुचविण्याचा उद्देश एवढाच की, या कालात प्रत्येक पाऊल विचाराने टाका. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. राजकीय–सामाजिक क्षेत्रांत तर चुकूनही पाऊल टाकू नका.

दशमातील गुरू तसे काही विपरीत घडू देणार नाही. पण जपून वागणे वाईट नाही. वाहनापासून अडचणी, गुप्त शत्रूंचा त्रास, वाढत्या खर्चाची विवंचना इ. प्रकार सतत अनुभवावे लागतील.

दि. १२ ते १४ काहीसा अनुकूल काल.

**मकर** : गुरु-हर्षल भाग्यात एवढे भांडवलही व्यावसायिक क्षेत्रात विक्रमी यश मिळवायला पुरेसे आहे.

चौथ्या शनीमुळे काही कामे रेंगाळतीलही, पण अपेक्षाभंग चुकूनही होणार नाही, याची खात्री बाळगा.

नोकरीधंद्यातील स्थान उंचावेल, प्रगतीची नवी क्षेत्रे हस्तगत केली जातील. साहित्याच्या प्रांतात, शैक्षणिक क्षेत्रात तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

स्थावराचा प्रश्न मात्र झटपट सुटेल असे दिसत नाही. वाहन काहीसे त्रासदायक ठरेल.

सभा-संमेलने गाजवली जातील, व्यावसायिक संघर्ष मिटू लागतील.

दि. ८ ते ११ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : या वेळी अंतरिक्षात कोणतीही ग्रहस्थिती अशी नाही की, जी तुमची वेगवान प्रगती रोखू शकेल.

गेल्या आठवड्यापासूनच आपल्या वेगवान प्रगतीला प्रारंभ झाला असेल. य वेळी अपेक्षित यश पदरी पडायला हरकत नाही.

आठव्या गुरुबद्दल फारसा विचार करण्याचे कारण नाही. व्यावहारिक प्रगतीसाठी अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. दैविक कृपेचा प्रत्यय येईल. सामाजिक जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील आणि वज्ञानिक क्षेत्रातील प्रतिष्ठेचे स्थान भूषवावे लागेल.

दि. १२ ते १४ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**मीन** : शनीच्या साडेसातीने पिडलेली आणि पिचलेली मने यापुढे तरतरीत व टवटवीत दिसू लागतील; साडेसाती अजुनी संपलेली नसली तरी ही साडेसाती सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येऊ शकणार नाही.

हा आठवडा व आगामी २-३ महिन्यांचा काल आपल्या प्रगतीचा वेग निश्चितच वाढवील. नव्या व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण घडेल, नवा उत्साह, नवा जोम घेऊन आपण भविष्यकालाची वाटचाल करू लागाल तेव्हा अत्युत्तम प्रगतीचे यश फारसे दूर नाही असा आपणांस साक्षात्कार घडून येऊ लागेल.

साहित्य, नाट्य-कला या क्षेत्रांत पुन्हा आपण अत्युच्च स्थान मिळवू शकाल.

दि. ९ ते ११ येथूनच प्रगतीकडे पावले पडू लागतील.

O

कशाला तरी शरण जावे लागते. कोणाचे तरी श्रेष्ठत्व मान्य करावे लागते. समाजाच्या हितासाठी. ज्या तत्त्वांना शरण जावयाचे त्यालाच परमेश्वर किंवा धर्म अशा संज्ञा आहेत ना? मग ज्यासाठी हा आटापीटा करावयाचा ती ध्येयेच जर मुळात साध्य होणार नसतील किंबहुना त्या ध्येयांविरुद्ध वागणूक जर घडत असेल तर आम्ही काय समजायचे? न समजणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याएवढे बुद्दू आम्ही खासच राहिलेलो नाहीत.

एका बाजूला मानवाचे हित, बंधुभाव, सहिष्णुता यांचा डांगोरा पिटला जातो. आणि दुसऱ्या बाजूला शूद्र आणि हरिजन हे जनावरेच आहेत, त्यांनी जनावरांप्रमाणेच राहिले पाहिजे, असे प्रतिपादन केले जाते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी बोलणाऱ्या माणसालाच भरपूर प्रसिद्धी आणि अनुयायी. प्रचंड दक्षिणा यांनाच आणि देव्हाऱ्यात पादुका ह्यांच्याच. जन्मामुळे माणसाला निकृष्ट ठरवावयाचे. हरिजनाच्या मुलाला कडेवर घेणाऱ्या नामदेवांचे भागवत देवळात वाचावयाचे आणि बाहेर पडल्यावर शूद्रांना जगण्याचा हक्कच नाही म्हणणाऱ्याच्या पायाची षोडशोपचारे पूजा करावयाची. ज्या हरिजनाच्या मुलाला नामदेवांच्या कडेवर बसण्याचे भाग्य मिळाले तोच हरिजन देवळाबाहेर चपला सांभाळत बसलेला असतो. त्याच्या अंगावर पाच पैसे फेकून चपला घेताना त्याचा स्पर्श न होईल याची खबरदारी घेत, दिमाखाने त्याच्यापुढून निघून जावयाचे. आम्हांला हा प्रकार अगम्य वाटतो.

ज्या गोमातेसाठी प्रचंड आंदोलने उभारली जातात, शिरकाणे होतात, जाळपोळ, विध्वंस, अत्याचार आणि हत्याकांडे होतात, त्या बिचाऱ्या लाखो गोमाता इथे कच्छमध्ये गटार हुंगत फेकून दिलेल्या उष्टया अन्नाचे तुकडे खात आणि मरणाची वाट पाहत फिरताना दिसत असतात ही क्रूर वस्तुस्थिती आहे. आपली आई फेकून दिलेल्या उष्टया अन्नाच्या तुकडयावर जगते हे कोठल्या स्वाभिमानी मुलाला आवडेल?

अशा परिस्थितीत कशाबद्दलचे प्रेम खरे मानावयाचे? हत्याकांडाचे का गोमातेचे?

**कच्छ सत्याग्रहात 'जत' मुसलमानांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. भारताच्या संदर्भात 'बेटीपर सौदा हो सकता है, लेकिन माँपर नहीं' असे उद्गार त्यांनी काढले. कच्छच्या सरहद्दीवर राहणाऱ्या या हजारो मुसलमानांना—की जे भारताला आई मानतात त्यांना—आमच्या सहिष्णू भारतात काय स्थान आहे?**

जपमालेत बोट अडकवून स्वतःची मनगटे लोक विसरू लागले आहेत. बुद्धिवादाला तिलांजली दिल्याकारणाने डोके फार हलके झाले आहे. त्यामुळे अन्यायापुढे ते झुकवणे फार सुलभ जाते. स्वतःजवळ सर्व साधने उपलब्ध असताना त्यांचा उपयोग करावयाचा नाही. संकटे आली की, मग मात्र परमेश्वराचा धावा करावयाचा, त्यालाच आमचे भले करायला सांगायचे, ' सर्वेऽपि सुखिनः सन्तुः ' अशी तिरक्या भाषेत प्रार्थना करावयाची ! ' आम्ही ' सुखी करू असे म्हणावयाचे नाही. प्रवचनाला इंपाला घेऊन जायचे आणि पुन्हा या देशातल्या गरीब माणसांचे भले करण्यासाठी परमेश्वरालाच बोलवावयाचे हा कुठला न्याय ? वेळेवर पाऊस पडला नाही म्हणून गुजराथ विधानसभेमध्ये चक्क भजन केले जाते. वरुणराजाला आळवण्यासाठी ! इतके अधिकार, संपत्ती आणि मनुष्यबळ हातांशी दिले असताना आपण काही करू शकत नाही ही वस्तुस्थिती भजनाच्या तारस्वरांत जनतेपासून लपवायची.

धर्माचा अर्थ आम्ही काय लावायचा ? सत्य दडवण्याचे एक साधन, अन्याय करण्याचे एक शस्त्र आणि नाकर्तेपणा लपविण्यासाठी निर्माण केलेला रमणीय बुरखा असाच धर्माचा अर्थ आम्ही करावयाचा काय ? कशाही परिस्थितीत जगणे हाच एक महद् धर्म हिंदुस्थानात होऊन बसला आहे. हा पैलू प्रस्थापित हिंदू धर्माच्या चौकटीत कोठे बसतो ? प्रस्थापित न्यायव्यवस्थेवर आजपर्यंत तरी विश्वास होता. पण आज तोही उडाला आहे. कच्छच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय ही भारतीय लोकशाहीच्या आणि न्यायाच्या दफनाला दिलेली शेवटची सलामी आहे.

सत्याग्रह्यांवर एक खटला भूजमध्ये झाला. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रटने १४४ कलम चुकीचे होते म्हणून सत्याग्रहींना निर्दोष सोडून देताना ' लवाद आंतरराष्ट्रीय असल्याने माझ्या अधिकारकक्षेत काही करता येत नाही, ' असे मत प्रकट केले. सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश सरकारचा हलफनाफा (Affidavit) गृहीत धरतात. आणि जिनिव्हामध्ये झालेल्या अन्यायाकडे दिल्लीत अन्याय करून काणाडोळा करतात. सीमांकन आणि आपल्या प्रदेशाचे दान रोखू शकत नाहीत. व्यापारीवृद्धीने.

मॅजिस्ट्रेटच्या अधिकारकक्षेत अन्यायकारक लवाद कार्यवाहीत का येऊ शकतो ? एक स्वतंत्र विचाराचा भारतीय नागरिक म्हणून नकार देण्याचे धाडस का केले जात नाही ? सुप्रीम कोर्टसुद्धा न्यायाला मूठमाती देते. अशा प्रकारे देशाचे दान करू देणाऱ्या, व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या पळवाटा जर कायद्यात असतील तर कायदेपंडितांना ते दूषणास्पद आहे. बुद्धिवंतांना आणि विधिमंडळाला लांच्छनास्पद आहे.

जनसामान्यांना न्याय आणि संरक्षण देणारी अर्थव्यवस्था आम्हांला हवी आहे. कच्छमधल्या गरीब माणसांना रोजगार मिळण्यासाठी उद्योग निर्माण केले जात

नाहीत. कच्छ सोडून इतर ठिकाणी देशाबाहेरसुद्धा कच्छी लोकांना जावे लागते. प्रचंड उद्योगपतींना मात्र आणखी एका 'मिठापूर' योजनेची संधी घरबसल्या दिली जाते. प्रचंड उद्योगांमध्ये पैसा आणि काळ यांची मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते. परिणामत: अर्थव्यवस्थेचा समतोल ढळून भरमसाट चलनपुरवठा, आर्थिक दिवाळखोरी आणि किंमतींची बेसुमार वाढ हे दुष्परिणाम घडून येतात. यासाठी कमी पैसा, जास्त मनुष्यशक्ती यांचा उपयोग करून त्वरित फळ देणाऱ्या शेतीसारख्या उद्योगाची वाढ व्हायला पाहिजे. पण गेल्या काही वर्षांतला अनुभव आणि आजचे छोट्या मोटारींच्या उत्पादनाच्या दिशेने वाहणारे 'पंतप्रधानी वारे' पाहता हे होईलसे दिसत नाही. योग्य मार्गांचा अवलंब करणे हे उघड्या नागड्या स्वार्थापायी स्वत:ची पोतडी भरू पाहणाऱ्या मंडळींच्या हातातच.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इंग्लंडच्या बँकेत भारतातर्फे पौण्डाच्या स्वरूपात पैसा साठवला गेला होता. काही वर्षांपूर्वी अमूल्य परकीय चलनाची चणचण भासू लागली, तेव्हा या कोल्ह्यांची नजर त्या गुंतवणुकीवर जाऊन तो पैसा वापरण्यात आला. सौंदर्यप्रसाधने, रेडिओ, चैनीच्या वस्तूंसाठी लागणारे प्लॅस्टिक यांसारख्या अयोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी मुक्तहस्ताने तो पैसा वाटला गेला. प्रचलित अर्थव्यवस्थेमध्ये केवळ असल्या प्रकरणांसाठी तरतूद आहे काय ?

सीमा भागांचा विकास वाटेल ती किंमत देऊन केलाच पाहिजे असे म्हणण्याची तयारी आज अर्थव्यवस्थेच्या सूत्रधारांची नाही. गरजेप्रमाणे अर्थशास्त्र वाकले गेलेच पाहिजे. व्यक्तिगत स्वार्थाला जर प्रचलित अर्थव्यवस्थेमध्ये वाव असेल तर राष्ट्रीय हिताला का असू नये ?

विचारप्रणाली, स्वतंत्र विचारबुद्धी हा डबा प्रचलित गाडीच्या गार्डाचा डबा आहे. राजकीय संकट किंवा आर्थिक तंगी या कशातूनही मार्ग काढावयाचा असेल तर कणखरपणा आणि ज्वलंत राष्ट्रप्रेम हाच तरणोपाय आहे. आज मनुष्य राष्ट्रीय अस्मिता गमावून बसला आहे. खोट्या प्रतिष्ठेच्या आणि भ्रामक समृद्धीच्या आशेने स्वातंत्र्याच्या आरशात समृद्धीची प्रतिमा पाहताना क्रूर वस्तुस्थितीच्या एका दगडातच त्या आरशाचा चक्काचूर होतो आणि विफलतेच्या स्वरूपात त्या असंख्य काचांचे तुकडे त्याला ओरबाडतात; रक्तबंबाळ करतात.

नवीन इमारत बांधावयाची असेल तर त्या जागची जुनी इमारत नष्ट करावी लागेल. असलेल्या इमारतीला कामचलाऊ टेकू देऊन ती जर उभी केली तर काही काळ जरूर टिकेल, पण भूकंपाच्या छोट्या उद्रेकानेही ती जमीनदोस्त होईल.

अनिश्चित आणि फार थोडा काळ जीव मुठीत घेऊन जगायचे आहे, की जुन्या वास्तूच्या विध्वंसाची किंमत मोजून भविष्यकाळात सुखाने राहावयाचे आहे, हाच आमचा आजच्या भारतीय समाजाला सवाल आहे. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

लेनिनला नकोसा झालेला स्टॅलिन
स्टॅलिनच्या मूर्तिभंजनात धन्यता मानणारा ख्रुश्चेव्ह
ख्रुश्चेव्हला अज्ञातवासात ढकलणारे ब्रेझनेव्ह–कोसिजीन
प्रत्येकजण आपणच लेनिनचे सच्चे वारसदार आहोत
असे उच्चरवाने सांगत होते, सांगत आहेत.

लेनिनपंथाला लाभलेली ही दांडगी लोकप्रियता
लेनिनच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचाच पुरावा आहे.

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या
जीवनकार्याचे समग्र दर्शन

## व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे
मूल्य : रुपये अठरा
राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर